# जीवनविद्येचा दीपस्तंभ

डिसेंबर २०२२

हास्यातुनी सांडती तुझ्या,
सुख, आनंद, ऐश्वर्याचे कण..
एक एक कण वेचतो मी,
स्मरण तुझेच करीत क्षण न् क्षण..
शब्दांतून झळकते तुझ्या,
दिव्यत्वाचे तेजोमय किरण..
उजळून निघू दे आता,
सर्वांसह माझे हे जीवन..



प्रत्येक कृती ही राष्ट्रहिताची, विश्वशांतीची..

जीवनविद्येचा ई दीपस्तंभ डिसेंबर - २०२२

वर्ष १ ले

अंक १४ वा

# अनुक्रमणिका


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | संपादकीय | ३ | १०) | प्रश्न तुमचे उत्तर श्री प्रल्हाददादांचे | २२ |
| २) | सिंचन ज्ञानामृताचे | ४ | ११) | मन मंदिरा | २४ |
| ३) | प्रल्हाद वाणी | ७ | १२) | यजुवेंद्र महाजन यांची ओळख | २६ |
| ४) | जीवनविद्येच्या कार्याची दखल | १० | १३) | पर्यावरण हाच नारायण | ३० |
| ५) | जीवनगौरव पुरस्कार वृतांत | ११ | १४) | अग्निशमन दलात जीवनविद्या | ३२ |
| ६) | बालकट्टा-संस्कार कथा | १६ | १२) | कारागृहात पोहोचली जीवनविद्या | ३३ |
| ७) | बालकट्टा-विज्ञान आणि मानव | १९ | १३) | संस्कार शिक्षण | ३४ |
| ८) | बालकट्टा-खरे स्वातंत्र्य | २० | १७) | प्लास्टिक मुक्त अभियान | ३५ |
| ९) | बालकट्टा-कविता | २१ | १८) | कोर्स शेड्युल | ३६ |


संपादिका : सौ. शिल्पा ढगे, बी. ए.

**सहसंपादक : डॉ. सौ. प्रभा मोदी.** M.S.(Mum.), F.R.C.S. (England) / **श्री. अरविंद चौधरी.** ICWA, M.Com., B.A.

**मुद्रक : प्रकाशक : सौ. शिल्पा ढगे** यांनी जीवनविद्या मिशन, मुंबई यांच्यासाठी,

**जीवनविद्या मिशन,** 'भक्तियोग', २८ ए, दत्ताराम लाड मार्ग, काळाचौकी, मुंबई - ३३. भ्रमणध्वनी : ९१६७७५५२१४ येथून प्रसिद्ध केला.

**बोरीवली प्रशासकीय कार्यालय** : ए - 2, सिद्धार्थ नगर बि. क्र. ५, को.ऑप.हौ.सोसायटी, धीरज उपवन समोर ,

पश्चिम द्रुतगती मार्गाजवळ, बोरीवली (पूर्व), मुंबई - ६६. दूरध्वनी : ०२२ २८८७९०१५ -०१६ ,भ्रमणध्वनी :९९३०४ ९९३०५

www.jeevanvidya.org Email: ho@jeevanvidya.org / office@jeevanvidya.org

| कार्यकारी मंडळ | मुखपृष्ठ संकल्पना | सहकार्य |
|---|---|---|
| श्री. ए. जी. बेळवेकर<br>सौ. अनिता मोरे | श्री. विठ्ठल घाडी | कांचन पालव, स्वाती संदाशी<br>विनया हडकर, हेमांगी पवार |

SUBSCRIBE US ON @ JEEVANVIDYAMISSION www.youtube.com/jeevanvidyaMission

LIKE US ON @ JEEVANVIDYAMISSION www.facebook.com/jeevanvidya

FOLLOW US ON @ JEEVANVIDYA www.twitter.com/jeevanvidya

FOLLOW US ON @ JEEVANVIDYAOFFICIAL www.instagram.com/jeevanvidyaofficial

# संपादकीय...

२०२२ हे वर्ष जीवनविद्या मिशनच्या कार्याच्या दृष्टीने खूप महत्त्वाचे ठरले. जगातील प्रत्येक माणूस सुखी व्हावा आणि आपले राष्ट्र सर्वार्थाने प्रगतीपथावर जावे हा दिव्य संकल्प, हे मिशन म्हणजे सद्गुरूंनी नामधारकांसाठी निर्माण केलेली व्यवस्था. अनेक वर्षांपासून हे कार्य अविरत सुरुच आहे परंतु आता या कार्याने एक वेगळे वळण घेतले आहे. या वर्षी नवीन क्षेत्रात प्रवेश करुन, नवी आव्हाने स्विकारुन सुद्धा कार्याला वेग आला आहे. श्री. प्रल्हाददादा यांचा अमेरिकी दौरा हे या वर्षातील महत्त्वाचे पाऊल होते. सद्गुरू जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'प्रत्येक कृती राष्ट्रहीताची, विश्वशांतीची' म्हणत सर्व नामधारकांना प्रोत्साहन देत असताना दादा स्वतः तरुणाच्या उत्साहाने कार्य करीत आहेत.

जीवनविद्या मिशनचे सामाजिक व शैक्षणिक कार्य समाजातील सर्व स्तरातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम राबविले जात आहेत. कैद्यांना मार्गदर्शन हा या कार्याला मिळालेला नवा आयाम आहे. तुरुंगात शिक्षा भोगत असलेले कैदी जीवन जगण्याची कला शिकत आहेत. केलेल्या कृत्याचा पश्चात्ताप होऊन यापुढे निसर्ग नियमांना अनुसरून जीवन जगण्याची शपथ ते घेत आहेत. ही बाब उल्लेखनीय आहे.

भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने नुकतेच राष्ट्रीय आत्महत्या प्रतिबंधक धोरणाचे अनावरण केले. येत्या दशकात मानसिक आरोग्याला चालना देण्यासाठी आणि आत्महत्या रोखण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम राबविले जाणार आहेत. पुढील आठ वर्षात सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये मानसिक आरोग्यदायी अभ्यासक्रम समाविष्ट करण्याचे उद्दिष्ट आहे. खरंच अशा कार्यक्रमांची आज समाजाला खूप गरज आहे.

माणुस तंत्रज्ञानावर नको तितका अवलंबून राहू लागला आहे. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे ऐन दिवाळीत फक्त दोन तासांसाठी व्हॉट्सअपची सेवा तांत्रिक बिघाडामुळे बंद झाली होती. सर्व न्यूज चॅनलच्या हेडलाईनला तीच बातमी! 'व्हॉट्सअपने ऐन दिवाळीत केला हिरमोड. शुभेच्छा संदेशांसह व्हिडिओ कॉलिंगलाही वेट अँड वॉच.' लोकांचे मानसिक स्वास्थ्य बिघडण्यासाठी अशा रंगवून सांगितलेल्या बातम्या तसेच सोशल मीडिया आणि तंत्रज्ञानाचा गैरवापर या दोन गोष्टी महत्त्वाची भूमिका बजावतात.

समाजातील प्रत्येक माणसाचे मानसिक आरोग्य उत्तम राहण्यासाठी जीवनविद्या मिशन गेली कित्येक वर्षे कार्य करीत आहे. वैज्ञानिक दृष्टीकोनावर आधारीत जीवनविद्या तत्वज्ञानाचा स्वीकार केल्यानंतर जीवनात सुखशांती निर्माण झाली अशा आशयाचे किती तरी अनुभव दीपस्तंभामध्ये प्रकाशित होत असतात. संयम आणि सामंजस्य या मूल्यांचे संस्कार जीवनविद्या करते. जीवन जगताना जे या ज्ञानाचा उपयोग करतात त्यांना मानसिक स्वास्थ्य लाभते. अशा स्थीर मनाच्या व्यक्तीसमोर कोणतीही परिस्थिती आली तरी तो शांतपणे विचार करू शकतो.

सरत्या वर्षातील चांगल्या गोष्टी पुढे नेत सर्वांनी नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी सज्ज होऊया. सद्गुरू जन्मशताब्दी वर्षानिमित्त होणाऱ्या कार्यासाठी दीपस्तंभाचे वाचक व हितचिंतकासह सर्वांना खूप शुभेच्छा!



# सिंचन ज्ञानामृताचे

## सुख हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे. भाग १०

जगातील प्रत्येक माणूस एकाच गोष्टीसाठी सतत धडपड करीत असतो. अगदी मरेपर्यंत आणि मेल्यानंतरसुद्धा त्याची धडपड एकाच गोष्टी साठी चाललेली असते ते म्हणजे सुख ! वास्तविक “सुख हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे.” माझा म्हणण्यापेक्षा प्रत्येकाचाच हा हक्क आहे. पण असे असूनसुद्धा ते आपल्याला मिळत नाही? लोकमान्य टिळकांनी म्हटले होते “स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे” पण ते आपल्याला सहज मिळाले नाही. त्याप्रमाणेच सुख हा जन्मसिद्ध हक्क असूनही माणसाच्या वाट्याला दु:ख येते. सुख मिळविण्यासाठी माणूस धडपड करीत असतो तरी त्याच्या वाट्याला सुख येण्याऐवजी दु:ख येते. कोलंबस हिंदुस्थानचा शोध करायला निघाला व पोहचला अमेरिकेला तसे आपण सुख मिळावे म्हणून करतो प्रवास करतो व पोहचतो दु:खाच्या प्रदेशात. त्याचे कारण आपण सुख पाहिजे असे म्हणतो पण म्हणजे नक्की काय पाहिजे याचा आपण कधीही विचारच केलेला नसतो. सुखासाठी आपण प्रयत्न करीत असतो पण जे माहित नाही ते मिळवणार कसे? ज्या गावाला जायचे आहे ते कुठे आहे तेच जर माहित नसेल तर तिथे पोहचणार कसे ?

एखादा भ्रमिष्ट माणूस भरकटत रहातो त्याला रस्ताच मिळत नाही कारण त्याला स्मृतिभ्रंश झाला आहे. तसे आपण जेव्हा चुकीच्या दिशेने जातो तेव्हा आपले जीवन भरकटले जाते. जगातील सर्व मंडळी भरकटलेली आहेत असे म्हटले तरी चालेल. ९९.९९ टक्के लोक भरकटलेले आहेत. याला दुसऱ्या भाषेत सांगायचे तर ते वेडे आहेत.

"जगी हा खास वेड्यांचा पसारा माजला सारा.<br>
कुणाला वेड कनकाचे, कुणाला कामिनीसाठी,<br>
कुणाला वेड सत्तेचे, कुणाला वेड धर्माचे,<br>
जगी हा खास वेड्यांचा पसारा माजला सारा."

घरात जर एक माणूस वेडा असेल तर तो काय धिंगाणा घालतो, तो काय धुमशान घालतो. कोकणातला शब्द धुमशान. तो घरातल्या इतर माणसांना नको जीव करतो. तो घरातल्या माणसांना त्रास देतो. शेजारच्या माणसांना जीव नकोसा करतो. जर एक वेडा एवढा धिंगाणा घालतो तर जगात इतके वेडे असताना काय होईल? हे वेडे काय धिंगाणा घालतात ते पहाण्यासाठी फक्त वर्तमानपत्र उघडा! कुठे लांब जायलाच नको. कोणी धर्मासाठी वेडे झालेले आहेत. कोणी पैशासाठी वेडे झालेले आहेत. कोणी सत्तेसाठी वेडे झालेले आहेत. कोण प्रतिष्ठेसाठी वेडे झालेले आहेत. कोणी आपल्या इगोसाठी वेडे झालेले आहेत. कोणी आपल्या नावासाठी वेडे झालेले आहेत. काही जण म्हणतात, "माझे नाव सांगितले तर तुझे काम होईल." कसले तुझे नाव? कोण विचारतो तुला? जरा रस्त्याच्या कडेला उभे राहिलात तर कुत्रे सुद्धा विचारणार नाही. आपण स्वत:ला मोठे समजतो. थोडीशी सत्ता हाती आली की हा अहंकारी होतो. याचे कारण अज्ञान. माणसाजवळ जेवढे अज्ञान अधिक तेवढा अधिक अहंकार. या अज्ञानामुळे माणूस स्वत: दु:खी होतो व इतरांना दु:खी करतो. हा वेडा स्वत: तर दु:खी असतोच पण सगळ्यांना दु:खी

करतो. तसे एक अज्ञानी माणूस स्वत: तर दु:खी असतोच पण हजारो लोकांना दु:खी करतो. एक हिटलर, त्याने डोक्यात काय घेतले आपण आर्य वंशाचे आहोत बाकीचे तुच्छ आहेत. इंग्लडबद्दल त्याला सॉफ्ट कॉर्नर होता. आपण आर्य वंशाचे आहोत या अहंकारातून तो ज्यू लोकांचा, इतर लोकांचा द्वेष करू लागला. त्यामुळे लाखो माणसे मेली, लाखो मुले अनाथ झाली. केवळ एका व्यक्तीच्या आपण आर्यन वंशाचे आहोत या अहंकारामुळे हे सर्व झाले.

हा वेड्यांचा बाजार जोपर्यंत संपत नाही व शहाणे त्यांची जागा घेत नाहीत तोपर्यंत हे जग सुखी होईल अशी आशा करणे व्यर्थ आहे. विज्ञानाने कितीही प्रगती केली तरी हे जग सुखी होईल अशी आशा करणे व्यर्थ आहे. आतापर्यंत विज्ञानाने अनेक शोध लावले. त्यात टेलिफोन, विमान, मोबाईल, लिफ्ट अशा अनेक गोष्टी आहेत. लिफ्टमध्ये तुम्ही बटण दाबले कि आपोआप वर वर जाऊ लागता. बटण दाबले की आलो खाली. विज्ञानाने प्रचंड प्रगती केली तरी माणूस सुखी झाला का? पूर्वी फक्त लढणारीच माणसे मारली जात. पण आता लढणारी माणसे मरतातच पण ज्यांचा लढाईशी संबंध नाही तेही मारले जातात. हिरोशिमा व नागासाकीवर बॉम्ब टाकला तेव्हा किती तरी माणसे मारली गेली, किती तरी अपंग झाली ज्यांचा याच्याशी संबंध नव्हता. पूर्वी तलवारी होत्या. तलवारीने माणसे किती मरणार? आता बंदुकीने रंगपंचमी खेळतात. विज्ञानाने ही जी प्रगती केली त्याने सुख मिळते का? शांती मिळते का श? विज्ञानाच्या प्रगतीने आधीभौतिक प्रगती होईल, त्याचबरोबर आधीभौतिक नाशही होईल. एक बॉम्ब पडला तर इमारतींचा नाश लगेच. विज्ञानाचे गोडवे गायले पाहिजे पण विज्ञानाने माणूस शहाणा होत नाही उलट त्याचा इगो वाढला जातो.

जितका इगो वाढलेला तितका माणूस सुख, शांती, समाधानापासून दूर जातो. म्हणून जगात हा जो सगळा वेड्यांचा बाजार आहे त्यातून वेडे गेले पाहिजे व शहाणे आले पाहिजे. Law ऑफ replacement. वेडे गेले पाहिजे म्हणजे वेड्यांना शहाणे करणे हा भाग आहे. शहाणे करण्यासाठी फार काही करावे लागत नाही, फक्त मार्गदर्शन पाहिजे. जीवनविद्या मिशनमध्ये हजारो लोक सुखी झाले कारण त्यांना आम्ही शहाणपण दिले, ज्ञान दिले, विचार दिले. लोक सुखी झाले कारण लोकांची भिती गेली. जीवनविद्या मिशनमध्ये येण्यापूर्वी कित्येक लोक पायी तीर्थयात्रा करायचे ते उपासतपास करत होते. स्वत:ला त्रास करून घेत होते व इतरांना त्रास देत होते. आम्ही त्यांना सांगतो उपास करण्याऐवजी लंघन करा. एक गोष्ट करू नका म्हणतो तेव्हा काय करा हेही सांगतो. उद्योगधंदा सोडून तीर्थयात्रा करणे हे जीवनविद्येला मान्य नाही. जीवनविद्या सांगते त्याऐवजी तुम्ही चांगले वाचन करा, चांगला उद्योग करा. काहीतरी योगदान कर आणि तुझा वेळ चांगल्या कामासाठी वापर. जे तुम्ही तीर्थयात्रेला जाऊन करणार ते तुम्हांला घरी राहून करता येते. हे तुकाराम महाराज सांगतात.

'ठायीच बैसोनी करा एक चित्त,
आवडी अनंत आळवावा।'

'नको सोडू अन्न नको सेवू वन.'

संत काय सांगतात ते आपण ध्यानात घेत नाही.

'तीर्थव्रत नेम भावेविण सिद्धी
वायाची उपाधी करीसी जना।'

हे ज्ञानेश्वर महाराज सांगतात.

'योगयाग विधी येणे नोहे सिद्धी
वायाची उपाधी दंभधर्म।'
ज्ञानेश्वर महाराज असे ही सांगतात
'जप तप कर्म क्रिया नेम धर्म
सर्वांघटी राम भाव शुद्ध।'
हा शुद्ध भाव धरा. बाकीचे जप तप कर्म कशाला पाहिजे. कर्म म्हणजे कर्मकांड कशाला पाहिजे.
'ज्ञानदेवी यज्ञयाग क्रियाधर्म,
हरीविण नेम नाही दुजा।'
हरिपाठात कितीतरी ठिकाणी एकच सांगितलेले आहे.

सांगायचा मुद्दा, आज जगात हा जो वेड्यांचा बाजार आहे तो संपण्यासाठी वेडे गेले पाहिजेत. म्हणजे माणसांना मारायचे नाही तर वेड्यांना शहाणे केले पाहिजे. एखाद्या वेड्याला शहाणे होण्यासाठी मानसोपचारतज्ज्ञाकडे गेले पाहिजे. तो जर गेला नाही तर तो घरात धुमाकूळ घालील. तसे सद्‌गुरू, मार्गदर्शक ह्यांची गरज असते. जो जन्माला आला तो शहाणा झाला असे होते का? जन्माला आल्यानंतर त्याला शिकावे लागते. तो बोलायला शिकतो ते आईकडून! नाहीतर त्याला बोलताच येणार नाही. जन्माला आलेल्या लहान मुलाचा कुणाशी संपर्क आला नाही तर तो बोलू शकणार नाही. आई जी भाषा बोलते ती भाषा तो बोलतो म्हणून तिला मातृभाषा




म्हणतात. मूल जन्माला आल्यानंतर आपण त्याला शिकवण देतो, शिक्षण देतो, खायला प्यायला देतो व मोठे करतो पण यातून शहाणपण येतेच असे नाही. त्याच्याकडे शहाणपण येण्यासाठी आईवडीलांकडे शहाणपण असले पाहिजे. त्यांनाही सद्‌गुरू, मार्गदर्शकांची गरज असते. आई तंबाखू खात असेल, वडील जर दारू पित असतील तर असे आईवडील मुलांना काय संस्कार देणार काय शिक्षण देणार? काय शिकवण देणार? म्हणून जीवनविद्या सांगते ज्या ज्ञानातून शहाणपण येते ते ज्ञान मिळाले नाहीतर तुम्ही वेडे म्हणजे अज्ञानी. अज्ञानी व वेडे एकच. जगात जोपर्यंत अज्ञान आहे तोपर्यंत माणूस सुखी होणे शक्य नाही. ज्ञान पाहिजे. ज्ञानाविणा माणूस दोन पायांचा पशू! ज्ञान हे सर्वात महत्वाचे म्हणून आम्ही सांगतो,
'ज्ञान हाच देव', 'ज्ञान हाच नारायण.'
'तुका म्हणे ज्ञान तोची नारायण जाणती सज्ञान गुरुपुत्र।'
'तुका म्हणे ज्ञान विठ्ठलची पूर्ण। सर्व अणूरेणू वागवीत।।'

ज्ञान हाच देव. देवाचा शोध करायचा म्हणजे ज्ञानाचा शोध करायचा हे पहिले लक्षात ठेवायचे. हे मी का सांगतो आहे? सुख हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे तरी तो तुला मिळालेला नाही. कारण का? तुमच्यावर दु:खाचे पारतंत्र्य आलेले आहे व हे पारतंत्र्य झुगारून टाकले पाहिजे व स्वराज्य मिळविले पाहिजे त्यासाठी लोकमान्य टिळक पाहिजे. लोकांनी ज्यांना मान्य केले आहे ते लोकमान्य! असे अज्ञानातून ज्ञानाकडे नेणारे सद्‌गुरू पाहिजेत. आता हे सद्‌गुरू मिळवायचे की नाही ते तू ठरव म्हणून
“तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार”

# प्रल्हादवाणी

## दृष्टी समतेची - १०

### सुखी जीवनाचे पंचशील - संपत्ती

गुरूपौर्णिमेनिमित्त आपण सर्वजण ज्ञानपीठात येतो याचा आपल्याला आनंद असतो. सद्गुरूंचे वास्तव्य जिथे आहे तिथे खऱ्या नामधारकाने वर्षातून एकदा तरी हजेरी लावलीच पाहिजे. सर्वजण इथे सुख मिळविण्यासाठी येतात आणि सुख मिळविण्यासाठी आपल्याला ज्ञान लागते. सर्व ठिकाणी ज्ञानच उपयोगी पडते म्हणून "ज्ञान हाच देव" आहे असे सद्गुरू सांगतात. प्रत्येकाला सुख हवं असते पण सुख म्हणजे काय आणि ते मिळवायचे कसे हे मात्र माहित नसते. सुख मिळविण्यासाठी पैसा हवा हे सर्वांनाच माहित आहे पण त्या जोडीला पुण्याई लागते हे कोणीही सांगत नाही. यश आणि समृध्दीसाठी पुण्याईची आवश्यकता असते. Health, Wealth, Success आणि Prosperity असते तेव्हाच माणूस खऱ्या अर्थाने सुखी होतो. या चारही गोष्टी मिळवून देण्याचे सामर्थ्य जीवनविद्येत आहे हे लक्षात ठेवायचे. पैसा आणि या चारही गोष्टी मिळण्यासाठी पुण्य लागते. इतकेच नव्हे तर चांगले सद्गुरू मिळण्यासाठीही पुण्य लागते. पैसा मिळविण्यासाठी प्रयत्न, कष्ट सगळेच करतात पण त्यांना यश देण्याचे काम मात्र पुण्याई करत असते. पाश्यात्य फिलॉसॉफर विचारांचे महत्व सांगतात पण पुण्याईचे महत्व कुणीच सांगितलेले नाही.

पैसा मिळवायचा कसा तो टिकवायचा कसा आणि उपभोगायचा कसा हे समजण्यासाठी शहाणपण लागते. जीवनात अनेक चांगल्या गोष्टी पुण्याईने मिळतात पण त्या टिकवून ठेवण्यासाठी शहाणपण लागते. देवाने उत्तम आरोग्य दिले पण ते राखण्यासाठी शहाणपण लागते म्हणून शहाणपणाला पर्याय नाही हे लक्षात ठेवायचे. सद् गुरु ज्ञान देतात म्हणजेच शहाणपण देतात.

सद्गुरूंकडे दर्शनासाठी झुंबड लागते पण ज्ञानासाठी झुंबड लागेल तो दिवस खरा. सद्गुरूंच्या ज्ञानाची, जीवनविद्येची म्हणजेच शहाणपणाची लालसा जेव्हा तुमच्याकडे निर्माण होईल तेव्हाच खरी गुरूपौर्णिमा असेल. शहाणपणाच्या मागे अध्यात्माचे एक सूत्रही आहे ते म्हणजे Detachment. आपण सर्व ठिकाणी. attach असतो पण जितके आपण datach राहू तितके सर्व काही मिळवून देण्याची ताकद या Detachment मध्ये आहे. माणूस पैशाला चिकटून न रहाता अलिप्त रहाता येत नाही. त्यात तो गुंतलेला असतो. माणूस जेवढा पैशाच्या मागे लागतो तेवढा पैसा त्याच्यापासून दूर पळतो. जेवढे ज्ञान, काम, कर्तव्य यांच्यामागे लागाल तेवढा पैसा तुमच्यामागे लागेल. माणूस आपल्या कुटुंबातही खूप गुंतलेला असतो. हे चांगले असले तरी जेवढे गुंतलेले असाल तेवढे दु:खी व्हाल. अलिप्त राहूनही माणसे आणि पैसा जोडता येऊ शकतो. अलिप्त राहूनही सर्व मिळविणे याला अध्यात्म म्हणतात. अलिप्त राहून माणूस जे काही करतो त्यात तो खऱ्या अर्थाने सुखी होतो. हा अध्यात्माचा विषयही सद्गुरू आपल्याला शिकवितात. संपत्तीच्या मागे न लागता




Conference Call

२०१२ पासून दर आठवड्याला चार कॉन्फरंस कॉल सुरु आहेत.
प्रत्येक कॉलवर हजारो लॉग इन देश विदेशातून सहभाग.
२५,००० सहभागी.

संग्रह www.jeevanvidya.org/audiocall वर उपलब्ध । कॉन्फरन्स कॉल संग्रहाचा सर्वांनी लाभ घ्या



संपत्ती आपल्यामागे लागली पाहिजे हा विचार मनात ठेवा. आपण पैशाच्यामागे लागतो पण पैंच्या मागे लागत नाही. पैंच्यामागे लागा पैसा तुमच्यामागे लागेल.

सद्‌गुरू सांगतात पैसा प्रामाणिकपणे कमवा. आपण आपलाच सेल्फी काढायचा की आपण खरेच प्रामाणिकपणे काम करतो का. दुसऱ्याकडून पैसा घेणे हा जसा भ्रष्टाचार आहे तसे कंपनीचे काम न करता किंवा कामात टाळाटाळ करून पगार घेणे हाही भ्रष्टाचारच आहे. आपण आपले काम प्रामाणिकपणे आणि सचोटीने केले पाहिजे. केवळ पैसा मिळविण्यासाठी जो काम करतो तो त्या पैशाला चिकटलेला असतो. त्यात तो माणूस गुंतलेला असतो. पण समाजासाठी देशासाठी काम करणे हे खरे काम आहे. माणूस पैशाने मोठा होत नसतो. जो ज्ञानाने, मनाने मोठा झाला तो खरा मोठा माणूस असतो. जो मनाने मोठा तो खरा मोठा आणि जो मनाने छोटा तो कोता. तर मग मनाने मोठा कोण? जो व्यापक विचार करतो तो मनाने मोठा. ही साधीसोपी व्याख्या आहे. मी आणि माझे हयात जो गुंततो तो कोता. आणि असा माणूस गोता खातो. आपण जे काम करतो ते समाजाच्या हिताचे आहे, राष्ट्राची त्याने प्रगती होणार आहे या विचाराने काम करणे म्हणजे प्रामाणिकपणे काम करणे. एवढे सोपे आहे. आपण केवळ आपल्या कंपनीसाठी नव्हे तर राष्ट्रासाठी काम करतो आहोत हा विचार जेव्हा मनात असतो तेव्हा काम करताना कधीच हलगर्जीपणा होणार नाही.

जपानमध्ये संप करण्याची पध्दतच वेगळी आहे. काळ्या फिती लावून ते कंपनीचा निषेध करतील पण काम राष्ट्रासाठी करत आहोत ही भावना असल्यामुळे काम दुप्पट करतील. काम करताना आपण राष्ट्रासाठी काम करतो ही भावना असेल तर पैशाच्यामागे लागण्याची गरजच लागणार नाही तो पैसाच तुमच्यामागे लागेल. लोकांचे पाय खेचून वर जाण्याची गरज नाही तर लोकच तुम्हाला वरच्या पदापर्यंत घेऊन जातील. व्यापक दृष्टी, व्यापक विचार करून पैसा कमवाल तर तो पैसा तुम्हाला उपयोगी पडेल. अनिष्ट मार्गाने मिळविलेल्या संपत्तीला अनिष्ट फाटे फुटतात. मुलांच्या हाती तो पैसा आयता लागतो आणि ती अनिष्ट मार्गाला वहात जातात. चांगल्या मार्गाने पैसा मिळविणाऱ्या माणसाची मुले कधीच वाया जाणार नाहीत कारण त्यात त्याची पुण्याई असते.

पैसा चांगल्या मार्गाने आणि व्यापक विचाराने कमविण्यात खरे शहाणपण आहे. पैसा



कसा कमवायचा हा जसा प्रश्न आहे तसा तो खर्च कसा करायचा हा ही महत्वाचा प्रश्न आहे. कसाही पैसा खर्च केला जातो. पैसा कमविण्यासाठी करियरच्या मागे धावतात पण करियरचा अर्थही माहित नसतो. इंजिनियर, डॉक्टर होणे म्हणजे करियर नव्हे. तर करियर हा प्रवास आहे. यशाच्या प्रवासाला करियर म्हणतात. क्वालिफिकेशन मिळविणे म्हणजे करियर नव्हे तर तिथून यशाचा प्रवास म्हणजेच करियर सुरू होते. विद्यार्थी ज्ञानासाठी अभ्यास करत नाहीत त्यामुळे त्यांना बेसिक गोष्टीच माहित नसतात. अशा विद्यार्थ्यांना नोकरी मिळणे कठीण जाते. कसेबसे पास होण्यासाठी जे अभ्यास करतात त्यांच्यावर घरी बसण्याची वेळ येते.



मुलांना चांगले वळण लागण्यासाठी पैशाचे वळणही चांगले असावे लागते. आडवळणाने मिळविलेला पैसा मुलांना चांगले वळण लावू शकत नाही. वॉरेन बुफे हे जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती आहेत. त्यांनी जो पैसा कमावला तो फक्त ऐषआरामात घालविला नाही. ऐषआरामात जीवन घालविले की आपण सुखी होऊ असे लोकांना वाटते पण असे सुखी होता येत नाही. अमेरिकेतील ऐश्वर्य पाहून लोकांचे डोळे दिपतात. तिथे गेल्यावर परत येऊ नये असे लोकांना वाटते. पण तिथेही खूप समस्या आहेतच. खूप पैसा मिळविला म्हणजे माणूस सुखी होतोच असे नाही. याचा अर्थ पैसा नको असे नाही. पण तो मिळविण्याचा मार्ग चांगला असला पाहिजे. समाजासाठी राष्ट्रहितासाठी कर्तव्य भावनेने काम करतो तेव्हा तिथे कसलाच गुंता नसतो. समाज आहे म्हणून आपण आहोत हे लक्षात ठेवून आपण आपले काम कर्तव्य भावनेने केले पाहिजे. आपण जे उत्पादन करतो ते समाज वापरतो आणि समाजात जे निर्माण होते ते आपण वापरतो. आपण जर वाईट उत्पादन केले किंवा वाईट सेवा दिली तर प्रतिक्रिया स्वरूपात आपल्याला वाईट गोष्टी मिळतात.

'सुखी जीवनाचे पंचशील' यांत सुख हा शब्द आहे आणि सुख म्हणजे काय हे समजल्याशिवाय सुखी होणे अशक्य आहे. सुख मिळवायचे कसे हे समजल्याशिवाय सुखी होणे अशक्य आहे. सुख मिळविण्यासाठी शहाणपण लागते जे आपल्याला सद्‌गुरूंच्या ज्ञानातून मिळते. मला एक गोष्ट जाणवली ती म्हणजे लोक सद्‌गुरूंवर मनापासून प्रेम करतात पण सद्‌गुरूंच्या ज्ञानाचा अभ्यास मात्र करीत नाहीत. सद्‌गुरूंवर प्रेम असणे वेगळे आणि सद्‌गुरूंकडून ज्ञान घेणे हे वेगळे. ग्रंथदिंडी करतात पण स्वत: ग्रंथांचे वाचन करीत नाहीत हे माझ्या निदर्शनास आलेले आहे. वाचन, श्रवण, चिंतन, आत्मपरिक्षण आणि परिवर्तन ही साखळी आहे. सद् गुरू सांगतात आपल्याला क्रांती म्हणजेच परिवर्तन घडवून आणायचे आहे. आपल्या स्वतःमध्ये, देशामध्ये, विश्वामध्ये परिवर्तन घडवून आणायचे आहे. ते कधी घडेल? वाचन - श्रवणानंतर चिंतनाची गरजच आहे. यासाठी अभ्यासवर्ग चांगल्या पध्दतीने व्हायला पाहिजेत. त्याची व्यवस्था करण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. अभ्यासू लोकंच हे ज्ञान पुढल्या पिढीपर्यंत घेऊन जातील. असे हे ज्ञान पिढया न् पिढयापर्यंत आपल्याला पोहोचवायचे आहे. वाचन, श्रवण, चिंतन, आत्मपरिक्षण आणि परिवर्तन असा प्रवास आपण करूया आणि सर्वजण खऱ्या अर्थाने सुखी होवूया.

(२२ जुलै २०१८ गुरूपौर्णिमा पहिला दिवस प्रवचनावरून संकलित)

## जीवनविद्येच्या कार्याची दखल...

जीवनविद्या मिशन शासन आदेशान्वये महाराष्ट्रातील कारागृहांमधील सर्व बंदीबांधवांचे जीवन सुखी करण्याचा प्रयत्न करत आहे. या आणि अशा अनेक कामांमध्ये जीवनविद्या मिशन शांतपणे नकळत मनःपरिवर्तनाची क्रांती करत आहे. त्याचाच एक सुंदर अनुभव म्हणजे मुंबईतील कारागृहांचे Sports आयोजीत करण्यात आले होते. त्याचे खास आमंत्रण जीवनविद्या मिशनला देण्यात आले होते. मिशनच्या वतीने मी व डॉ. किशोर संख्ये उपस्थित राहिलो. यावेळी ठाण्याचे पोलीस सह आयुक्त, विशेष महानिक्षक कारागृह, मुंबईतील सर्व कारागृहांचे अधिक्षक, उप अधिक्षक उपस्थित होते.

आम्ही गेलो तेव्हा आमचे एवढे छान स्वागत झाले. सगळ्यांनी आवर्जून दखल घेत आदर व कौतुक व्यक्त केले. आम्ही पोहचत असताना ठाणे कारागृहाचे अधिक्षक आपल्या कार्यक्रमाचे यश सांगत होते.



त्यावर विशेष महानिक्षक कारागृह श्री. देसाई साहेबांनी प्रत्येक कारागृहातील बंदि बांधवांना जीवनविद्या मिशनचे व्यापक प्रमाणावर मार्गदर्शन व्हावे तसेच महिलां बंदीभगिनींसाठी विशेष काम करावे यासाठी प्रत्येक कारागृहातील अधीक्षकांनी जीवनविद्या मिशनला सहकार्य करून बंदि बांधवांच्या मनामध्ये आणि वैचारिक पातळीमध्ये कसे सकारात्मक बदल घडवून आणू याकडे आपण लक्ष देऊ असे आश्वासन दिले. या ठिकाणी मुंबईतील सर्व अधीक्षकांची भेट, ओळख झाली व त्यांचे मोबाईल नंबर सुद्धा मिळाले. त्या व्यतिरिक्त या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी, ठाणे जिल्हा सहआयुक्त आय.पी.एस.श्री. कराळे साहेब हजर होते. त्यांनासुद्धा जीवनविद्या मिशनतर्फे ठाणे जिल्ह्यातील पोलिसांसाठी मार्गदर्शन करण्याची विनंती करण्यात आली. लवकरच पोलीस कर्मच्याऱ्यांसाठी पुढील कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यासाठी डॉ.संखे यांना बोलाविले आहे.

अशा प्रकारचे वेगळे व महान कार्य करण्याची संधी मिळाल्याबद्दल सद्‌गुरूंची कोटी कोटी कृतज्ञता.

**स्वाती संदांशी व डॉ. किशोर संख्ये.**





# जीवनगौरव पुरस्कार वृत्तांत....

सद्‌गुरू श्री वामनराव पै यांची नव्व्याण्णवावी जयंती अर्थात 'आनंद मेळावा' जीवनविद्या मिशनच्या कर्जतस्थीत ज्ञानपीठामध्ये मोठ्या ऐश्वर्यात साजरा झाला. यावेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. संगीत जीवनविद्या, विविध मान्यवरांची व्याख्याने, पाहुण्यांची मनोगते, विविध अभियानांची माहिती देणाऱ्या ध्वनिचित्रफीती यासोबत श्री. प्रल्हाददादांचे मार्गदर्शन असे आनंद मेळाव्याचे स्वरुप होते. २९ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२२, सहा दिवस चालणाऱ्या या उत्सवाच्या दरम्यान जीवनविद्या मिशनच्या सर्व शाखांतील शेकडो नामधारक आणि निमंत्रित पाहुणे ज्ञानपीठामध्ये उपस्थित राहिले.

जीवनविद्या मिशनचे कार्य सातत्याने यशस्वीरित्या सुरू राहण्यासाठी आणि वाढण्यासाठी हजारो नामधारकांनी योगदान दिले आहे. 'हे जग सुखी व्हावे आणि आपले राष्ट्र सर्वार्थाने प्रगतीपथावर जावे' या दिव्य संकल्पच्या पूर्तीसाठी या निष्ठावंत नामधारकांनी अक्षरशः तन-मन-धन अर्पण करून कार्य केलेले आहे. त्यातीलच काही विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ नामधारकांना आनंद मेळावा या कार्यक्रमात जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सौ. वंदनाताई बेल्हे, डॉक्टर प्रभाताई मोदी, श्री. प्रभाकर नाईक, श्री प्रभाकर देसाई, श्री. नारायण चिंदरकर, श्री. शिवाजीराव पालव, श्री. विश्राम पवार, श्री. अशोक खवळे, श्री. अशोक परब, श्री. चंद्रकांत शिंदे, सौ. अस्मिता सामंत आणि श्री. विश्वास देशपांडे या बारा जेष्ठ नामधारकांना श्री. प्रल्हाद दादा यांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र या स्वरूपात जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले. पुरस्कार प्राप्त प्रत्येक सन्मानिय नामधारकाविषयी आदरणीय दादांनी गौरवोद्गार काढले तसेच जीवनविद्या मिशन परिवारातर्फे त्यांची कृतज्ञता व्यक्त केली.





सौ. वंदनाताई बेल्हे म्हणजे श्री सद्‌गुरूंचे प्रथम शिष्य श्री. वसंतराव मुळे यांच्या कन्या. वंदनाताईंनी संपूर्ण महाराष्ट्रभर गावोगावी जाऊन जीवनविद्येचा प्रचार-प्रसार अनेक वर्ष केला. त्यांनी प्रबोधन आणि संगीत जीवनविद्या या माध्यमातून खूप मोठे योगदान दिले आहे. सौ. वंदनाताई बेल्हे यांचा सत्कार त्यांचे पती श्री. मुकुंद बेल्हे व सुपुत्र यांनी स्वीकारला.



डॉक्टर प्रभाताई मोदी यांनी आपले पती डॉक्टर कांती मोदी यांच्यासोबत कार्य करून जीवनविद्या मिशनसाठी खूप मोठे योगदान दिलेले आहे. प्रभाताईंनी विविध प्रकारच्या

बोधप्रद काव्यरचना केल्या आहेत. 'जखडू गोंधळे' हे सुंदर रुपक काव्य लिहून प्रकाशीत केले. तसेच प्रबोधन आणि व्याख्यानं यांच्या माध्यमातून समाजातील उच्चविद्याविभुषित लोकांपर्यंत जीवनविद्या तत्वज्ञान पोहोचवले.






श्री. प्रभाकर नाईक यांनी अनेक वर्षे अभ्यासवर्ग घेऊन खूप मोठी सद्‌गुरू सेवा केली. त्यांच्या कन्या गीताताई दातार आणि नात गार्गी सुखटणकर या दोघी जणी अमेरिकेतील जीवनविद्या सेंटरच्या माध्यमातून खूप मोठे कार्य करीत आहेत.







श्री. प्रभाकर देसाई यांनी जीवनविद्या मिशन बेळगाव शाखेच्या उभारणीत तनमनधनाने खूप मोलाचे योगदान दिले आहे. त्यांनी सुरुवातीच्या काळात जीवनविद्या ज्ञानाच्या प्रचारासाठी प्रसंगी डोक्यावर ग्रंथाची पेटी घेऊन गावोगावी ग्रंथदिंडी केली आहे. आज वयाच्या शहाऐंशीव्या वर्षी देखील ते तितक्याच उत्साहाने कार्य करीत आहेत.





श्री. नारायण चिंदरकर यांनी सद्‌गुरूंनी आपल्याला दिलेली ज्ञानदृष्टी इतरांना मिळावी म्हणून स्वतःची दृष्टी कमजोर असूनही मुंबई उपनगरीय रेल्वेमधून अनेक वर्षे ग्रंथदिंडी केली. अनेक वर्षे प्रवचन आणि कीर्तन सेवा देण्यासाठी पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, कोकण तसेच गोवा, बेळगाव असा दूरचा प्रवास नियमितपणे केला.







जेष्ठ प्रबोधक श्री. शिवाजीराव पालव हे मुंबई आणि महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी जाऊन प्रवचन करतात. सातत्याने पंचवीस वर्षे सुरू असलेल्या श्री. शिवाजीराव पालव यांच्या अभ्यासवर्गाच्या माध्यमातून अभ्यासाची आणि साधनेची गोडी लागून कित्येक वक्ते आणि निष्ठावंत कार्यकर्ते घडले आहेत.





श्री. विश्राम पवार यांनी तीन वर्षे जीवनविद्या मिशनचे सहसचिव आणि सहा वर्षे विश्वस्त सचिव पद सांभाळत असताना खूप मोठे कार्य केले आहे. या दरम्यान महाराष्ट्रात विविध ठिकाणी होणाऱ्या समाजप्रबोधन कार्यक्रमांसाठी श्री सद्गुरूसोबत त्यांनी खूप प्रवास केला. जीवनविद्या मिशन सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त झालेला भव्य कार्यक्रम, कोकण आणि गोव्यातील प्रचारप्रसार, आकाशवाणीवरील प्रसारण या सर्व कार्यात त्यांनी खूप मोठे योगदान दिले आहे.






श्री. अशोक खवळे यांनी अनेक वर्षे प्रबोधन, संगीत जीवनविद्या तसेच गावोगावी जाऊन केलेली ग्रंथदिंडी या माध्यमातून खूप मोठ्या प्रमाणावर कार्य केले आहे. या कार्यात त्यांच्या पत्नी सौ. अर्चना खवळे यांनी कायम साथ देत असतात.








श्री. अशोक परब यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करुन जीवनविद्या मिशन, ठाणे-मुलुंड शाखेत पंधरा उपकेंद्रं सुरू केली आणि ती यशस्वीरित्या चालवण्यासाठी बालसंस्कार केंद्र, अभ्यासवर्ग असे विविध उपक्रम राबवले. आज वयाच्या पंच्याऐंशीव्या वर्षी सुद्धा ते हे कार्य करीत आहेत.




श्री. चंद्रकांत शिंदे यांनी जीवनविद्या मिशनचे विश्वस्त-सचिव म्हणून कार्य केले आहे. त्यांच्या कार्यकाळात जीवनविद्या मिशनच्या अनेक नवीन शाखा निर्माण झाल्या. त्यांच्या नियोजनात श्री. शिंदे यांचा खूप मोलाचा वाटा आहे. परेलच्या रेल्वे मैदानावर होणाऱ्या ज्ञानेश्वर माऊली पुण्यस्मरण सोहळ्यामध्ये त्यांनी जीवनविद्या मिशनला मोठे सहकार्य केले. उत्सवाच्या दरम्यान श्री सद्‌गुरूंच्या विश्रांतीची, तसेच पूर्ण वेळ कार्य करणाऱ्या स्वयंसेवकांच्या भोजनाची व्यवस्था ते स्वतः जातीने पहायचे. या सर्व कार्यामध्ये त्यांच्या पत्नी सौ. रेखा शिंदे याचा मोलाचा वाटा आहे.







श्री. शिंदे हे प्रगती मंडळ या शैक्षणिक संस्थेचे २०१० पासून अध्यक्ष असून माझगाव, शिवडी या कामगार विभागात १९६८ पासून गेली ५४ वर्षे "रात्रशाळा" चालवून शिक्षणक्षेत्रात कार्य करीत आहेत.






जेष्ठ प्रबोधिका सौ. अस्मिता सामंत यांनी तनमनधनाने जीवनविद्या मिशनच्या कार्यामध्ये

आपले योगदान दिले आहे. त्यांच्या कनिष्ठ भगिनी सौ. शितलताई गोरे यांच्यासह त्यांनी गोवा येथे खूप मोठे कार्य केले आहे. आपल्या प्रेमळ स्वभावामुळे सर्वांना आपलेसे करणे ही त्यांची खासियत आहे.









श्री. विश्वास देशपांडे यांनी जीवनविद्या मिशनच्या पुणे शाखेचे पहिले सचिव म्हणून कार्यभार सांभाळला. त्यांनी पुणे शाखेत अतिशय उल्लेखनिय असे कार्य केले. त्यानंतर जीवनविद्या मिशनचे कार्यकारी खजिनदार म्हणून सेवा देऊन पुढे विश्वस्त पदही भूषविले. त्यांची कन्या सौ. अश्विनी तासगावकर अमेरिकेतील जीवनविद्या सेंटरमध्ये अतिशय उत्तम कार्य करीत आहे.

अनेक वर्षे सातत्याने केलेल्या उल्लेखनीय कार्याचा यथोचित सन्मान करण्यासाठी जीवनविद्या मिशनने या जेष्ठ नामधारकांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान केला. त्यांच्या कार्यामुळे जीवनविद्या मिशनमध्ये अनेक कार्यकर्ते घडले आहेत. अनेक वर्षे सद्गुरूंच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूर्वक कार्य करीत या सर्व मान्यवरांनी समाजासाठी मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या कार्यामुळे शेकडो लोकांनी जीवनविद्या स्वीकारली, अनेक कुटुंब सुखी झाली आहेत. या सर्वांच्या कुटुंबातील सदस्यांचे या कार्यात योगदान सुद्धा अतिशय मोलाचे आहे. जीवनविद्या मिशनच्या माध्यमातून शैक्षणिक आणि सामाजिक कार्य करणाऱ्या सर्व नामधारकांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना उत्तम आरोग्य आणि दीर्घ आयुष्य लाभो ही सद्गुरू चरणी प्रार्थना.



# बालकट्टा

## संस्कार कथा...

एकदा काही वाटसरू काम शोधण्यासाठी एका गावातून दुसऱ्या गावाकडे निघालेले असतात. चालता चालता मध्ये एक जंगल लागतं. त्या जंगलातून पुढे जाण्याचा रस्ता त्यांना सापडत नसतो. इकडे तिकडे पाहिल्यानंतर एका झाडाखाली त्यांना एक साधु महाराज ध्यानस्थ बसलेले दिसतात. चेहऱ्यावरुन ते खूप ज्ञानी वाटत होते. वाटसरु त्यांच्याकडे जाऊन त्यांना नमस्कार करतात आणि म्हणतात, "महाराज आम्हाला कृपया आम्हाला मार्गदर्शन करा." साधू महाराज डोळे उघडतात आणि काय समस्या आहे हे त्यांना विचारतात. त्यावर गावकरी म्हणतात, "यावर्षी दुष्काळ पडला त्यामुळे शेती पिकली नाही. घरात खायला अन्न नाही. काहीतरी काम मिळेल या आशेने आम्ही या जंगलापलीकडे असलेल्या गावात चाललो आहोत. तिकडे जाण्याचा रस्ता दाखवलात तर फार बरे होईल."

साधु महाराज त्यांना सांगतात की, "जंगल पार करण्यासाठी दोन रस्ते आहेत. एक रस्ता घनदाट जंगलातून जातो. तिथे हिंस्र प्राणी आहेत आणि हा दुसरा रस्ता थोडा वळणावळणाचा आहे पण सुरक्षित आहे." वाटसरु दुसऱ्या रस्त्याने जायचे ठरवतात.

तेव्हा साधु महाराज म्हणतात की, "एक सांगायचे राहिले. हे बघा, या रस्त्यावर मध्येच एका ठिकाणी खूप छोटे छोटे खडे आहेत. माझी झोपडी त्याच दिशेला आहे. जाता येता ते खडे माझ्या पायाला टोचतात. खूप त्रास होतो. तुम्ही माझं एक काम कराल का? आता अंधार पडत आलाय. जाताजाता त्यातले जमतील तितके खडे उचला आणि तुमच्याकडेच ठेवा. म्हणजे मागून येणाऱ्या लोकांच्या पायाला ते लागणार नाहीत."

ते सर्वजण साधु महाराजांना नमस्कार करून निघतात. काही अंतर चालून गेल्यावर त्यांच्या पायाला खडे टोचू लागतात. अंधारात काहीच दिसत नसतं. त्यांच्यातील एक जण म्हणतो, "साधुने सांगितले तसे आपण हे खडे उचलून आपल्याजवळ ठेवूया." आणि तो जमेल तसे खडे उचलून आपल्या झोळीत ठेवायला सुरुवात करतो.

काही जण साधूने सांगितले म्हणून दोन चार दगड घेतात. त्यातील काही जण म्हणतात, "मागून येणाऱ्यांसाठी मी का म्हणून उचलू हे दगड!" आणि ते तसेच चालत रहातात. आणि त्यांच्यातील काही जण वाटेत येणारे दगड चक्क पायाने उडवून बाजूला करतात. एक दोन जण प्रामाणिकपणे वाटेत लागलेले सर्व दगड उचलत जातात. पण नंतर रस्त्याच्या कडेला टाकून देतात.



# बालकक्ष

जंगला पलिकडच्या गावाच्या रस्त्यावर येईपर्यंत सकाळ होते. उजेडात पाहिल्यावर त्यांच्या लक्षात येते की ते सामान्य खडे नव्हते तर किंमती रत्नं माणकं होती. त्यामुळे ज्याने साधु महाराजांच्या सांगण्यानुसार केले तो खूप श्रीमंत झाला. बाकी सर्वांना आपल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला.

गोष्टीचे तात्पर्य : आपल्या पेक्षा ज्ञानाने आणि अनुभवाने मोठी माणसं जे सांगतात ते कधी कधी आपल्याला पटत नाही पण नंतर लक्षात येते की ते आपल्या हिताचेच सांगत होते. पण तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते.

**अनिता सुनील मोरे**, सी. बी. डी. बेलापूर
९९६७९ ६६१५०

**अर्चित प्रसाद परब,** विलेपार्ले




## प्रत्येक कृती........

माझ्या मित्रांसोबत खेळताना स्वयंसूचना आणि विश्वप्रार्थना म्हणतो यामुळे माझ्या मित्रांना सुद्धा विश्वप्रार्थनेची गोडी लागली आहे. शिक्षकांसाठी, शाळेतल्या शिपाईकाकांसाठी, ड्रायव्हर काकांसाठी भले कर ची साधना मी करेन. ही सुद्धा राष्ट्रहिताची कृती आहे.

सद्‌गुरू सांगतात की आपण सुखी झालो तर आपला समाज सुखी होईल, जेव्हा समाज सुखी होईल तेव्हा आपला जिल्हा सुखी होईल. जेव्हा जिल्हा सुखी होईल तेव्हाच आपले राष्ट्र सुखी होईल आणि जेव्हा आपले राष्ट्र सुखी होईल आणि तेव्हा पूर्ण 'विश्व' सुखी होईल. अश्या प्रकारे शहाणपणाने निसर्गनियम पाळून मी राष्ट्र हिताची कृती करेन हे माझे राष्ट्रप्रगतीसाठी योगदान आहे.

नाव - **रीजुल राजन बागवे,** ढेकाळी, ठाणे.
शाखा - चेंबूर, गट - ' ब '

**नरधोंडे देव होती, अमृत सर्पाच्या दाती**
**होती काट्याची सुमन, लाभता पैगुरू चरण ॥धृ॥**

**वादळे हासरी झाली, ग्रिष्माला सृष्टी फुलली**
**ज्वाला हो शीतल छान, लाभता पैगुरू चरण ॥१॥**

**काकास कोकिळ कंठ, टिटवीस गरूड पंख**
**मर्कट होई हनुमान, लाभता पैगुरू चरण ॥२॥**

**-जगदीश**

# बालकला

**राम पाटील** , रामजी नगर




**माधवी घोलम,** विलेपार्ले




**तनिष्क पेडणेकर,** विलेपार्ले



# विज्ञान आणि मानव

विज्ञान हाच परमेश्वर किंवा विज्ञान आणि मानव किंवा विज्ञान आणि मानवी जीवन. खरे पाहता विज्ञान ही माणसाचीच निर्मिती आहे पण माणूस विज्ञानाच्या हातातील बाहुले झाला आहे, असे आज अनेक घटनांतून जाणवते. विशेषत: आपल्या दैनंदिन जीवनात आपल्याला असा अनुभव अनेकदा येतो. कधी कधी अगदी मोक्याच्या क्षणी विदयुत प्रवाह बंद पडतो. घरातील दिवे जातात, पंखा फिरत नाही, उद्वाहन ठप्प होते आणि आपण सारेजण अगतिक होतो; त्यावेळी आपणाला वाटू लागते कि माणूस हा विज्ञानाचा गुलाम झाला आहे.

संस्कृत भाषेत एक सुंदर सुभाषित आहे; ते असे कि विज्ञान हा मानवाला मिळालेला एक प्रभावी डोळा आहे त्याचा उपयोग जो करणार नाही तो खरोखरच आंधळा आहे खरे पाहता मनुष्य हा इतर प्राण्यांपेक्षा दुबळा आहे. त्याच्या जवळ हिंस्त्र प्राण्यांसारखे नखे व दात नाहीत, त्याला पक्षासारखे उडता येत नाही. वाघासारखे त्याचे पंजेही नाहीत. पण आज हा माणूस सर्व प्राण्यात आपल्या बुद्धीच्या बळाने विज्ञानाच्या किमयेने श्रेष्ठ व प्रबळ ठरलेला आहे. विज्ञानाने माणसाला चाकाचे रहस्य सांगितले आणि माणसाची गती वाढली. विजेचा शोध लागल्यावर बैलगाडी वापरणारा माणूस आगगाडी, विमानातून फिरू लागला. तो रॉकेटच्या सहाय्याने अंतराळात चंद्रावर जाऊन पोचला. स्वतःजवळ नसलेले उडण्याचे सामर्थ्य त्यांनी विज्ञानाच्या सहाय्याने मिळवले. माणसाने आता विज्ञानाचा उपयोग करून आपल्या शास्त्राला प्रबळ केले आहे.

माणसाच्या जीवनातील प्रत्येक क्षेत्राला विज्ञानाने स्पर्श केलेल्या आहे. माणसाच्या उपजिविकेसाठी शेतातही विज्ञान आवश्यक आहे. विज्ञानाच्या सहाय्याने अनेक खते संकरित बी-बियाणे आणि अनेक कृषी अवजारे शोधून काढली. त्यामुळे कृषी उत्पादनात प्रचंड क्रांती झाली आहे. विज्ञानाच्या सहाय्याने माणसाने आपले आयुमानही खूप वाढवलेले आहे. आज माणसाने वेद्यकीय क्षेत्रात अनेक प्रयोग केले आहेत त्यामुळे माणूस दिर्घायुषी झाला आहे आणि अनेक असाध्य आजारांवर त्याने मात केली.

संगणक आणि इंटरनेट ही आजच्या युगातील विज्ञानाची फार मोठी किमया आहे. हजारो किलोमीटरवर असलेल्या प्रियजनांचा आवाज घरबसल्या आपण कलोनिंगच्या द्वारे स्पष्ट ऐकू शकतो. पुण्यात आजोबांनी गणपतिची आरती केली आणि त्याचवेळी त्यांच्या अमेरिकेतील नातिने आरती म्हटली हे शक्य झाले विज्ञानामुळेच. आज इंटरनेटने माणसांना ज्ञानाचा धबधबा खुला केला आहे. चार देशातील राष्ट्रप्रमुख आपल्या देशात बसून एकत्र चर्चा करू शकतात ते केवळ विज्ञानामुळेच. विज्ञानाने सारे जग जवळ आणले आहे.

आजकाल वैज्ञानीक घोडदौडीत माणूस नैसर्गिक संतुलन हरवून बसला आहे. त्यामुळे विज्ञान हा माणसाचा शत्रू आहे अशा प्रकारची टिका विज्ञानावर कधी कधी केली जाते. पण गंभीरपणे विचार करता, यात विज्ञानाचा दोष नसून तो माणसांच्या वृत्तीचा दोष आहे. हे स्पष्ट होते.

असे हे विज्ञान मानवाला मिळालेले एक वरदान आहे. पण त्याचा अतिरेक व दुरुपयोग वाईटच. रासायनिक खतांमुळे पिके चांगली येतात ही दिसू लागताच आपण त्याचा भरमसाठ वापर करू लागलो तर त्यामुळे पीक चांगले येता येता जमीन नापीक बनू लागेल. अतिरेक व दुरुपयोग शेवटी माणसाला नाशाकडे घेऊन जातो म्हणून आपण विज्ञानाकडे कसे पाहतो, त्याचा कसा उपयोग करून घेतो यावर विज्ञान हे लाभदायक आहे कि नुकसानदायक हे ठरणार आहे.

स्पर्धकाचे नाव : **साईल विलास हरमलकर,** गोवा शाखा
स्पर्धा गट : गट ब



# बालकट्टा

## खरे स्वातंत्र्य

स्वातंत्र्य हा एक असा शब्द आहे जो प्रत्येक भारतीयाच्या नसामध्ये रक्तासारखा संचार करत असतो. स्वातंत्र्य हा प्रत्येक माणसाचा जन्मसिद्ध हक्क आहे. तुलसीदासजी म्हणतात,
"पराधीन सपनेहू सुखनाही"
म्हणजे गुलामगिरीमध्ये तर स्वप्नात देखील सुख नसते. गुलामगिरी तर कोणासाठीही अभिशाप आहे. ज्यावेळी आपला देश पारतंत्र्यात होता तेव्हा जगात आपला झेंडा ही नव्हता आणि आपले कोणतेही संविधान नव्हते. आज आपण पूर्णपणे स्वातंत्र्य आहोत आणि पूर्ण जगभरात भारताची एक स्वातंत्र्य ओळख आहे. भारताचे संविधान हे आज संपूर्ण जगासाठी एक उदाहरण आहे. यामध्ये सर्व देशवासीयांना समानतेचा अधिकार आहे. आमचा राष्ट्रीय झेंडा देखील प्रेम बंधुत्व आणि ऐक्याचे प्रतीक आहे.

भारतवर्षातील महान संविधानाचे लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात भारताच्या प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्येची ओळख करून दिली आहे. तसेच त्यांना विशेष अधिकार देखील दिले आहेत. आपला भारत देश स्वतंत्र झाल्यापासून आर्थिक आणि तांत्रिकदृष्टया समृद्धीच्या उंचीवर पोहोचला आहे.

आज संपूर्ण जगात भारत आशेचा किरण बनून सूर्यासम आकाशात चमकत आहे. हे सर्व स्वातंत्र्य भारतात शक्य आहे पण आम्हाला हे स्वातंत्र्य सहज मिळाले नाही. यासाठी अनेक देशातील शूरवीर आणि स्वातंत्र्य सैनिक हुतात्मा झाले आहेत आम्हाला त्यांचे आभार मानायला हवेत.

आज आपण या स्वातंत्र्याच्या मोकळ्या हवेत श्वास घेत आहोत. हे आपल्या भारतमातेच्या वीर सुपुत्रांची आठवण करून देते ज्यांनी स्वतः ला पूर्णपणे या देशासाठी अर्पण केले होते. भारतातील प्रख्यात विद्वान कवी, इतिहासकार किंवा लेखकांनी भारताची सामाजिक उन्नती करून भारताच्या स्वातंत्र्यासाठीच्या कार्यात चार पट वाढ केली

आज भारत संपूर्ण जगात अनेक गोष्टीत अग्रेसर आहे. सामाजिक कुरीती नाहीश्या होत आहेत आणि खेड्यागावंच्या स्थितीमध्ये देखील सुधारणा झाली. पण आजही भारतासमवेत संपूर्ण जग दहशतवाद्यांशी झुंज देत आहे. हे तर आपल्या सर्वांना ठाऊक आहे की दहशतवाद्यांना काहीच धर्म नसतो. काही लोक दहशतवादाच्या नावाखाली अनेक निर्दोष लोकांना ठार मारतात. देशाच्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करतात. याचा परिणाम म्हणजे लोकांमध्ये सरकारी धोरण आणि देशाच्या संरक्षण यंत्रेबद्दल संभ्रम निर्माण होता.

भारतवर्षाला पूर्वीसारखे सुवर्ण पक्षासारखे बनवायचे आहे आणि स्वांतात्र्याचा खरा अर्थ समजायचा आहे. प्रत्येक भारतीयाने आपल्या अधिकारापेक्षा आपल्या कर्तव्याचे पालन करायला हवे, तरच आपले देश संपूर्ण जगात महासत्ता म्हणून समोर येईल.
भारत मातेचा विजय असो. आम्ही सर्व एक आहोत.
भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या शुभेच्छा.

स्पर्धकाचे नाव - **निधी प्रवीण बांगर,** मंचर
गट अ



# बालकक्ष

## पालकांनो ठेवा तुम्ही ध्यानी

संस्कार केंद्रातील मुले म्हणजे
भावी पिढीतील उमलणारी फुले.....
सर्वार्थाने राष्ट्र प्रगती पथावर जाईल
केवळ त्यांच्या मुळे...!!

कुंभार घडवितो घट मातीचा
देऊनी सुंदर आकार......
तैसे बाल वयात सुंदर विचार देऊनी
बनवू त्यांच्या जीवनाचे शिल्पकार..!!

जीवनविद्या गर्जून सांगे
तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार...
विचार बदला नशिब बदलेल
मग येईल जीवनाला सुंदर आकार..!!

अट्टाहासे संस्कार केंद्रात आणा
होईल विचारांची जडण घडण...
जिवन त्यांचे सुंदर होण्यास
लागेल जीवनाला वळण..!!

शिल्पकार तूच तुझ्या जीवनाचा
हे घोष वाक्य ठसवू त्यांचे मनी...
जीवन त्यांचे सुंदर होईल
पालकांनो ठेवा तुम्ही ध्यानी...!!

**देविदास सुर्यवंशी,** कळंबोली
९८६९४६९८२७

## माणूस आणि विज्ञान

विज्ञानामुळे आपले जीवन खूप सुखी व समाधानी झाले आहे. दैनंदिन जीवनात आपण कळत-नकळत विज्ञानाचा वापर करत असतो. जसे की वाटण तयार करताना आपण मिक्सरचा वापर करतो. त्यामुळे आपले श्रम व वेळ या दोन्ही गोष्टी वाचतात. पूर्वीच्या काळी या कामासाठी पाटा-वरवंटा वापरण्यात येत होता. त्यावेळी हे काम करायला अधिक श्रम व वेळ लागत होता. नंतर हळू-हळू माणसाने विज्ञान क्षेत्रात प्रगती केली आणि अनेक गोष्टींचा शोध लावला आणि आपले जीवन सोपे केले. विज्ञानामुळे क्षयरोग, कॉलरा, कर्करोग या सारख्या आजारांवर उपाय सापडले आहेत. त्यामुळे अनेक माणसांचे प्राण वाचवले जात आहेत.

आज असे कोणतेही क्षेत्र नाही जिथे विज्ञानाचा वापर होत नाही. शेतीपासून ते मोठ-मोठ्या व्यवसायांपर्यंत सर्व ठिकाणी विज्ञानाचा वापर होतो. आधुनिक भारताने विज्ञान आणि तंत्रज्ञानावर अधिक लक्ष केंद्रित केले आहे. आर्थिक वाढीसाठी तो महत्त्वाचा घटक आहे. वैज्ञानिक संशोधनाच्या क्षेत्रात भारत जगातील अव्वल देशांपैकी एक आहे आणि अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात पहिल्या पाच देशांपैकी एक आहे.

विज्ञान जसे वरदान आहे तसे शाप देखील ठरू शकते ते त्याच्या वापरण्याच्या व अंमल करण्याच्या पद्धतीमुळे. जसे की रासायनिक खतांचा अतिवापर जमिनीला नापीक बनवतो. विज्ञानाकडे आपण कसे पाहतो त्यावर आहे की विज्ञान लाभदायक की नुकसानदायक हे ठरते.
"विज्ञानाची धरूया कास, राष्ट्राचा करूया विकास."

स्पर्धक -**प्रचिता मांजरेकर,** नायगाव - नालासोपारा
स्पर्धा गट अ



# प्रश्न तुमचा उत्तर प्रल्हाददादांचे

**प्रश्न : नवीन जन्म घेतल्यावर मायेच्या प्रभावाने आपल्याला विसर पडतो तर मोक्ष ही तात्पुरती गोष्ट आहे का ?**

**उत्तर:** जीवनाचे कोडे सोडविणे म्हणजे खरेतर मोक्ष. या जन्मात मोक्ष मिळाला असेल तर पुढील जन्मात लगेचच आत्मज्ञान होते. उदा. ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरी सांगितली म्हणजे त्यांना लहान वयातच आत्मज्ञान झाले. याचे कारण त्यांचे मागील जन्मातील ज्ञानच पुढे carried forward झाले. आपल्या सद्‌गुरुंना सुध्दा तरुण वयातच आत्मज्ञान झाले.

**प्रश्न : प्रत्येक धर्माचा परमेश्वर वेगवेगळा आहे अशी समजूत आहे तर हे कितपत खरे आहे ?**

**उत्तर :** प्रत्येक धर्माचा परमेश्वर वेगवेगळा असूच शकत नाही. सर्वांचा परमेश्वर एकच आहे. एकदा परमेश्वर म्हणजे काय हे समजले तर सर्वांचा परमेश्वर एकच आहे ही गोष्ट ध्यानात येते. कुठलीही शक्ती घ्या ती सर्वांसाठी एकच असते. सूर्य, वीज, गुरूत्वाकर्षण शक्ती, वाफेची शक्ती वगैरे जर धर्म-राष्ट्र हा भेदभाव न करता सर्वांसाठी एकच आहे तर परमेश्वर हा वेगळा कसा असू शकेल. परमेश्वरा विषयी प्रत्येक जण आपआपल्या कल्पना करतो हाच फरक आहे. कुणीही प्रार्थना केली तर त्यांना जो प्रतिसाद मिळतो तो निसर्गनियमांप्रमाणे मिळतो. प्रार्थना कुणीही जर मनापासून केली असेल तर ती फळतेच. कुठल्याही देवाला हाक मारली तरी ती पोहचते ती अंतर्मनापर्यंत आणि प्रतिसादही अंतर्मनाकडूनच मिळतो. हेच मूळ तत्व आहे. जात धर्म पंथ कुठलाही असला तरी प्रार्थनेला प्रतिसाद अंतर्मनच देते. प्रार्थनेला फळ देण्याचे काम अंतर्मनच करते.

**प्रश्न: प्रार्थना म्हणता म्हणता मन विचलित का होते?**

**उत्तर:** प्रार्थनेवर जर विश्वास नसेल तर एकीकडे प्रार्थना म्हणतो आणि दुसऱ्या बाजूने निगेटिव्ह विचार करतो त्यामुळे त्याचा परिणाम मिळत नाही. ज्ञान मिळवाल तेव्हा त्या ज्ञानाच्या अधिष्ठानावर तुम्ही प्रार्थना केली की मनातून भिती पूर्ण निघून जाते आणि प्रार्थनेवर विश्वास बसतो. सद्‌गुरूभाव म्हणजे सद्‌गुरूंवर सोपवून देणे किंवा स्वतःच्या अंतर्मनावर विश्वास ठेवणे. जर तुम्हाला स्वतःच्या अंतर्मनावर विश्वास ठेवायला जमत नसेल तर सद्‌गुरूंवर सोपवायला शिका. याचा अर्थ प्रार्थना करीत रहा आणि परिणाम सद्‌गुरूंवर सोपवा हीच खरी साधना. प्रयत्न, विश्वप्रार्थना, भलं कर साधना आणि कृतज्ञता साधना हेच खरे आपले कर्म आहे. हे कर्म केल्यावर तुम्ही जेव्हा संपूर्णपणे सद्‌गुरूंवर सोपवता तेव्हा तुमची कामे होणारच.

**प्रश्न : परमेश्वर दिसत नाही मग तो आहे हे कशावरून?**

**उत्तर :** परमेश्वर दिसायलाच पाहिजे ही लोकांची संकल्पनाच चुकीची आहे. चित्रकलेत, चित्रपटांत देव निरनिराळ्या रुपात दाखविला जातो. त्यामुळे लोकांनाही तो आपल्याला त्या रुपात दिसायला हवा असे वाटू लागते. लोकांच्या संकल्पनाच चुकीच्या असल्यामुळे लोकांची फसगत झालेली आहे. परमेश्वर ही शक्ती आहे असे म्हणतो तेव्हा हे लक्षात घेतले पाहिजे की ही शक्ती दिसण्याची गोष्ट नाही तर ती अनुभवण्याची गोष्ट आहे. गुरूत्वाकर्षण शक्ती आपल्याला दिसू शकत नाही तशी परमेश्वरी शक्ती सुद्धा आपल्याला दिसू

शकत नाही. इतकेच नव्हे तर कुत्रा, मांजर हयांना जेवढे दिसू शकते तेवढेही आपल्याला दिसू शकत नाही. कारण आपल्या दृष्टीत तेवढे तेजच नसते. प्रत्येक प्राण्याच्या काही मर्यादा आहेत. त्यामुळे जे आम्हाला दिसत नाही ते मान्य नाही हया म्हणण्याला काही अर्थ नाही. सच्चिदानंद स्वरूप चैतन्यशक्तीकडे जे ज्ञान आहे ते प्रत्येक पेशीत दडलेले आहे. वैज्ञानिक असा युक्तीवाद करतात की ते ज्ञान डीएनए कडून आलेले आहे. पण खरेतर हे ज्ञान चैतन्यशक्तीकडून आलेले आहे. आईच्या उदरात असलेल्या बाळाकडे ज्ञान येते कुठून हा कुणीच विचार करीत नाही. डीएनए हे स्थुल आहे पण चैतन्यशक्ती ही दिव्य आणि सूक्ष्म आहे तिच्याकडून हे ज्ञान येते.

**प्रश्न : परमेश्वर प्राप्तीसाठी मन धरावे लागते तर हे मन कसे धरायचे ?**

**उत्तर:** आपले मन हे आपल्या ताब्यातच नाही. ते इथेतिथे धावत असते. भविष्यकाळ आणि भूतकाळात ते नाचत असते. ते स्वत: भरकटत असते आणि आपल्यालाही सोबत खेचत नेते. आपण जर घोडयावर स्वार झालो तर आपण त्या घोडयाला आपल्या मुक्कामापर्यंत घेवून जातो. पण जर आपण घोडयावर व्यवस्थित रितीने स्वार होवू शकलो नाहीतर तो घोडा आपल्याला वाटेल तिथे फरफटत घेऊन जाणार. आपण मनाला ताब्यात घेतले तर आपल्याला पाहिजे तिथे त्याला नेता येईल. आज आपण मनाच्या ताब्यात असल्यामुळे आपल्याला मन त्याला पाहिजे तिथे घेऊन जात आहे. कधी भूतकाळात तर कधी भविष्यकाळात घेऊन जाते. आपण विचार करतो हे ही माणसाला माहित नाही. आपण भूतकाळ आणि भविष्यकाळ यांचा विचार करतो. आपण वर्तमानकाळात रहातच नाही. मनाला वर्तमानात स्थीर करणे आणि विचाररहीत करणे यालाच म्हणतात मनाला धरणे. मनाला भूतकाळ आणि भविष्यकाळ यात धावू न देता त्याला विचाररहित करणे हेच आपले काम आहे. जे असते ते आत्मतत्व असते. आत्मतत्व सदैव असतेच पण आपण वर्तमानात न राहिल्यामुळे आपल्याला ते अनुभवता येत नाही. जो आत आहे त्याच्याशिवाय दुसरे काहीच नाही. त्यानेच हे शरीर धारण केलेले आहे. तो निरनिराळ्या आकारात आहे. आपले मन तिथे स्थीर नसल्यामुळे आपल्याला त्याची अनुभूती येत नाही. नाक दाबले की हवेची अनुभूती येते तसे मन दाबले की परमेश्वराची अनुभूती येते. जेव्हा विचार बंद होतात तेव्हा तो तिथेच असतो. त्याचे भान कसे घ्यायचे ते आपल्याला सद्गुरू शिकवितात. त्या साधनेचा अभ्यास करता करता एक दिवस आपल्याला त्याची अनुभूती येते. ती शक्ती आपल्यासोबत असूनही आपल्याला त्याची अनुभूती येत नाही. आपण कधी कधी चष्मा डोळ्यावर न ठेवता डोक्यावर ठेवतो आणि घरभर तो चष्मा शोधत रहातो. तसेच आत्मतत्वाचे आहे. आपले लक्ष तिथे नसते म्हणून ते आपल्याला दिसत नाही. पण आपण जर लक्ष दिले तर ते आत्मतत्व सुध्दा आपल्या ध्यानात येईल.  परमेश्वर ही गोष्टच अनंतस्वरूप आहे त्यामुळे तो आकळणे आपल्याला शक्य नाही. खूद्द खुदालाही त्याच्या अनंतस्वरूपाची जाणीव नाही.

India Conference Call  Dt. 16/11/2022

**मानवी संस्कृती अखिल मानव जातीला एकच असते, ज्याप्रमाणे अखिल मानव जातीला आकाश एकच असते त्याप्रमाणे.**

**सद्गुरू वामनराव पै**

# मनमंदिरा

लेख : १४

'हीच अमुची प्रार्थना अन् हेच अमुचे मागणे
माणसाने माणसाशी माणसासम वागणे'

हे गाणे ऐकले आणि मनात विचार आला जर जगातील सर्व माणसे अशी वागली तर किती बरे होईल. सर्वांचे जगणे सुंदर होईल. पण वास्तव हे आहे की आज विज्ञान तंत्रज्ञानाच्या विकासामुळे प्रत्यक्ष संवाद साधून एकमेकांना समजून घेत जीवन जगण्याची वृत्ती मागे पडत चाललीय. एक प्रकारचा अलिप्तपणा माणसाच्या मनात निर्माण झालाय. मी सुखी कसा होईल याच्या पलीकडे कोणाला काही सुचत नाही. त्यामुळे इतरांना समजून घेणे कमी झालंय. बऱ्याच पालकांना स्वतःच्याच मुलांशी कसे वागायचे याची जाणीव नसल्याने घराघरातील मुलांना मानसिक ताणतणावाला सामोरे जावे लागत आहे.

किशोर वयात पदार्पण केलेल्या मुलांच्या मानसिक विकासासाठी पालकांनी कोणती काळजी घेणे आवश्यक आहे हे आपण या लेखमालेत पहात आहोत. या वयातील मुलांना आपण मोठे झालो असेही वाटते आणि त्याच वेळी इतरांनी आपली काळजी घ्यावी असेही वाटते. ही दोन परस्परविरूद्ध आंदोलने त्यांच्या मनात सुरू असतात. मनातील या संघर्षामुळे काही मुले चिडचिड करतात तर काही एकाकी रहातात. घरात रहाण्यापेक्षा बाहेर मित्रमैत्रिणींसोबत तासनतास वेळ घालवायला त्यांना जास्त आवडते.

सूज्ञ पालक मुलांची मानसिक गरज ओळखतात. ते आपल्या मुलांना त्यांची स्पेस देतात त्याच वेळी गोड बोलून त्यांच्यावर योग्य ते नियंत्रणही ठेवू शकतात. सामान्यपणे मुलांनाही अनिर्बंध स्वातंत्र्य नकोच असते. कारण त्यांना आईवडिलांच्या संरक्षणछत्राचीही गरज असते. या वयातील मुले बाहेर जास्त रमतात यावर तोडगा म्हणून पालक अधेमधे मुलांच्या मित्रमैत्रिणींना घरी बोलावू शकतात. एकत्र अभ्यास करण्यासाठी, वाढदिवसाच्या निमित्ताने ते घरी आले तर आपली मुले कोणाच्या संगतीत आहेत हे सुद्धा समजेल. या वयात मिळणारी संगती मुलांच्या जीवनाला कलाटणी देणारी ठरू शकते. शिवाय पालकांचे मुलांशी सौहार्द्रपूर्ण संबंध असतील तर या मुलांची तारुण्याकडे वाटचाल सोपी होते.

या वयात बहुतेक सर्व मुलांमध्ये अति उत्साह, विचार न करता झटकन प्रतिक्रिया देणे, दुसऱ्याचे ऐकूनच न घेणे अशी वृत्ती असते. मुलांना कितीही समजावलं तरी ते पटत नाही. त्यामुळे भांडण, वाद निर्माण होऊन अनेकदा मुलं छोट्याछोट्या गोष्टीवरून निराश होताना दिसतात. अशा परिस्थितीत पालक मुलांशी संवाद साधताना त्यांना सांगू शकतात की, 'मी तुझ्या वयाचा असताना असाच होतो. या वयात सर्वच असे वागतात. तू काही




## स्त्री सन्मान अभियान

स्त्रीचा आत्मसन्मान जागृत करून सर्वांनी स्त्रीचा सन्मान करावा यासाठी जनजागृती करत आहोत.
या उपक्रमांतर्गत महिलांना मुख्य प्रवाहात आणले जात आहे.
१) बेटी बचाव, २) बेटी पढाव, ३) विधवांना वेगळी वागणूक न देणे
२०१६ पासून. महाराष्ट्र. दोन कार्यशाळा.

जगावेगळं वागत नाहीस. शारिरीक आणि मानसिक बदलांमुळे हे होत असतं. पण अशा वागण्याने स्वतःचं आणि कुटुंबातील इतर सर्वांचं नुकसान होतं ही गोष्ट लक्षात घेऊन आपण आपलं वागणं बदलण्याचा प्रयत्न करायचा.' मुलांना समजून घेऊन अशाप्रकारे काही गोष्टी सांगितल्या तर त्यांना त्या नक्की पटतात.

जर पालकांनी स्वतःचं उदाहरण दिलं तर मुलांवर त्याचा सकारात्मक परिणाम होतो. अशीच परिस्थिती तुमच्यावर आली होती किंवा अशी तुमची मनस्थिती झाली होती तेव्हा तुम्ही काय केलंत, हे जर मुलांना समजावून सांगितलं, तर मुलं ते ऐकतात आणि त्यानुसार वागण्याचा प्रयत्न करतात. पालक मुलांचे role model (आदर्श) असतील तर मुलांना वाढवणे या गोष्टीचा भार न वाटता ती एक सुंदर आणि संस्मरणीय प्रक्रिया होईल.

सर्व सामान्य घरातील मुलं आणि पालकांविषयी आपण हे सर्व बोलत आहोत. पण याच वयोगटातील आई-वडिलांचा आधार नसलेली किंवा बाल गुन्हेगारीत अडकून निरिक्षण गृहामध्ये आलेली जी मुलं असतात त्यांची गोष्ट फार वेगळी असते. त्यांना चांगली संगती नाही मिळाली तर ते बेछूट वागू शकतात. पण कोणी थोडा जरी मानसिक आधार दिला तर ती सामान्य घरातील मुलांपेक्षा जास्त समजुतदारपणे वागतात. याचा अनुभव बालगृहातील मुलांना भेटल्यावर येतो. माझी बहिण डॉ. शारदा निवाते ही शिक्षण तज्ज्ञ आहे. बालगृह आणि निरिक्षण गृहामधील मुलांचा भावनिक विकास या विषयावर PhD केली आहे. मला सुद्धा या विषयात आवड असल्याने तिच्या सोबत या मुलांना भेटायला बऱ्याचदा जायचे. याशिवाय जीवनविद्या मिशनच्या संस्कार शिक्षण अभियानाच्या निमित्ताने या मुलांना भेटता येते. तेव्हा लक्षात येते की या मुलांना भेटवस्तू आणि खाऊ देणे यापेक्षाही त्यांच्याशी कोणी प्रेमाने, आपुलकीने बोलले तर त्यांना जास्त आवडते.

तसेच किशोर वयातील मुलं संस्कारक्षम असतात. यावेळी आदर्श व्यक्तींची चरित्रे, देशभक्तीची भावना प्रज्वलित करणारे व सद्‌गुणांचा संस्कार घडविणारे वाङ्मय त्यांना सहज उपलब्ध करून दिले पाहिजे. याच वयात वाईट संगत लागल्यास वाईट सवयी आणि व्यसने लागण्याचा संभव असतो. म्हणून त्यासंबंधी योग्य लक्ष देऊन मुलांना चांगल्या सवयी लावणे हे शिक्षक-पालकांचे कर्तव्य असते. सामाजिक जबाबदारी म्हणून जीवनविद्या मिशन या संस्थेने सुरु केलेले बालसंस्कार केंद्र आणि युवा केंद्र या मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी खूप उपयुक्त आहेत. त्याचा लाभ शिक्षक व पालकांनी आपल्या मुलांना जरुर करुन द्यावा. या संदर्भात अधिक माहितीसाठी माझ्याशी संपर्क करु शकता.

**अनिता सुनील मोरे**, सी. बी. डी. बेलापूर
९९६७९ ६६१५०



## यजुर्वेंद्र महाजन यांची ओळख

जीवनविद्या सांगते उद्योग हाच खरा योग आहे. जीवनविद्या ज्ञानपीठ, कर्जत येथे सद्‌गुरू श्री वामनराव पै यांच्या जयंतीनिमित्त झालेल्या 'आनंद मेळावा' या कार्यक्रमात कॉर्पोरेट तसेच सामाजिक विश्वातील यशस्वी व्यक्तिमत्वांना आमंत्रित केले होते. यशाचे शिखर गाठताना या प्रवासामध्ये त्यांनी ध्येय गाठण्यासाठी घेतलेली मेहनत, यशस्वी होण्यासाठी त्यांची असलेली महत्वाकांक्षा, विचारशक्ती, कल्पकता, नाविन्यता यांची घातलेली सांगड अर्थात त्यांच्या यशाचे रहस्य, त्यांच्या अनुभवाची आणि यशस्वी जीवनाची गाथा त्या सर्व मान्यवरांनी आपल्या व्याख्यानातून श्रोत्यांना सांगितली.

आनंद मेळाव्यातील पहिल्या दिवशी महाराष्ट्रातील प्रेरणादायी वक्ते श्री. यजुर्वेंद्र महाजन यांचे व्याख्यान होते. उपस्थित श्रोत्यांसोबत संवाद साधत त्यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांच्या कार्याची थोडक्यात ओळख करुन घेऊया.

‘श्री. यजुर्वेंद्र महाजन हे दीपस्तंभ फाऊंडेशन’ जळगावचे संस्थापक आहेत. शिक्षणक्षेत्रातील अभ्यासक आहेत आणि सामाजिक कार्यकर्तेही आहेत. त्याचप्रमाणे ‘राष्ट्रीय दिव्यांग कल्याण समिती’, ‘राष्ट्रीय मानवाधिकार आयोग-भारत सरकार’ याचे ते सदस्य आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील स्पर्धा परिक्षा करिअर क्रांतिचे ते प्रणेते आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली चौदा वर्षात पाचशेहून अधिक विद्यार्थी प्रशासकीय अधिकारी व चौदाशे विद्यार्थी विविध पदांवर कार्यरत झाले आहेत. ते ‘करिअर काउन्सिलर’ व ‘व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षक’ आहेत. ‘१८ वर्षांवरील गरीब, आदिवासी, अपंग आणि अनाथ विद्यार्थ्यांना गुणवत्तेचं शिक्षण मिळाल पाहिजे, समाजाने त्यांना आपले मानून बळ दिले पाहिजे या उद्देशाने प्राध्यापक यजुर्वेन्द्र महाजन यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसोबत ‘दीपस्तंभ फाऊंडेशंन’ अंतर्गत ‘मनोबल’ आणि ‘संजीवन’ प्रकल्पाची सुरुवात केली. अंध, अस्थिव्यंग, मुकबधिर, अनाथ आणि आदिवासी विद्यार्थ्यांना हायर एज्युकेशन, एमपीएससी, स्टाफ सिलेक्शन, बँक, काम्प्युटर ट्रेनिंग तसंच स्किल डेवलपमेंट हे सर्व निवासी आणि निःशुल्क प्रशिक्षण देणारी ‘दीपस्तंभ’ ही भारतातील पहिली संस्था आहे. अपंगत्व म्हणजे दुबळेपणा हा गैरसमज पुसून मनोबलने अनेक दिव्यांग विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना बळ दिलंय. मनोबल केंद्रातील अनेक जण आज स्वतःच्या पायावर मोठ्या स्वाभिमानाने जगत आहेत. त्यांच्या डोळ्यांतिल अश्रूंची जागा आज आत्मविश्वासाने घेतली आहे. ते रडण्याऐवजी परिस्थितीशी दोन हात करत आहेत. आणि हा आशेचा प्रकाश त्यांच्या आयुष्यात आणलाय ‘दीपस्तंभ फाऊंडेशनच्या’ ‘मनोबल’ प्रकल्पाने. इथे राहणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याचा एक वर्षाचा खर्च जवळपास ८० हजार रुपये आहे आणि हा खर्च अनेक चांगल्या संस्थांच्या, सेवाभावी माणसांच्या आर्थिक मदतीतून भागविला जातो. आज ‘मनोबल’ प्रकल्पात २७२ विद्यार्थी रहातात. ‘मनोबल’ अशा जिद्दी विद्यार्थ्यांसाठी हक्काच घर आहे. त्यांना कोणाची दया नको. मैत्री, विश्वास आणि प्रेम हवे आहे. सर्वांगीण विकास, प्रेम, आनंद आणि आत्मविश्वास प्राप्त झाल्याने ही मुलं आयएएस, इन्कम टॅक्स ऑफिसर, बँक ऑफिसर बनून परिस्थितीशी लढत आहेत. ‘मनोबल’ ही भारतातील वंचित युवक युवतींसाठी एक नवी पहाट आहे. त्यांचा संकल्प आहे, "चला, आपण सर्व जण एकत्र येऊन हे जग अधिक सुंदर आणि अर्थपूर्ण बनवूया."

**यजुर्वेंद्र महाजन यांचे आनंद मेळाव्यातील संक्षिप्त व्याख्यान - दिनांक २९.१०.२०२२**

प्रल्हाददादा तुमची परवानगी न घेता मी आपली विश्वप्रार्थना एका ओळीची बनविली आहे. टी-२०चा जमाना आहे. लोकांना बऱ्याच वेळा वेळ नसतो. आपल्या सगळ्या प्रार्थनेचे सार मी असं काढलं आहे जी प्रार्थना आता मी रोज करणार आहे ती अशी आहे "हे ईश्वरा सर्वांना जीवनविद्या मिशनमध्ये सहभागी होऊन स्वतःचं जीवन घडविण्याची बुद्धी दे." एवढीच बुद्धी झाली पाहिजे. जी आपल्याला प्रत्येकाला दिलेली आहे. कुठे जावे आणि कुठे जाऊ नये एवढी बुद्धी मिळाली की पुढचे आपोआप सगळे होते आणि अशी बुद्धी ज्यांना लाभली आहे अशा सर्व भाग्यवंतांना मी नमस्कार करतो.




मी माझे भाग्य समजतो की मी जीवनविद्या परिवाराशी जोडलो गेलो. मी आता जीवनविद्येची पुस्तकं वाचायला सुरुवात केली आहे. मला असं जाणवतयं की अरे हे सगळे करण्याचा तरं मी प्रयत्न करतोय इतके दिवस! सद्गुरूंनी असं लिहिलयं, 'माणूस म्हणून जन्माला येणं ही खूप भाग्याची गोष्ट आहे. शरीर ही किती मोठी गोष्ट आहे. शरीर हाच ईश्वर आहे.' माणूस म्हणून मी ज्या दिवशी जन्माला आलो तो सर्वात भाग्याचा क्षण हे ज्यांना हे समजलं त्यांना डिप्रेशन येत नाही, आयुष्यात कधीच निराशा येत नाही. त्यांना अँक्झायटी येत नाही.

अधीक उन्नत, उत्तम विचार आणि त्याप्रमाणे कृती करण्याची शक्ति ही माणसाला मिळाली आहे. प्राण्याला मिळालेली नाही. जसा विचार करता त्याप्रमाणे स्वतःला घडवणे हे फक्त माणसाला जमते. हे प्राण्याला जमत नाही. आपल्या भारतीय अध्यात्मामध्ये म्हटलंय 'कोहम- सोहम' मी कोण आहे आणि मी कशासाठी आहे. याची उत्तर ज्यांना सापडतात आणि जगाचं कल्याण ज्यांच्या मनात येत ते सद्गुरू बनतात. मला आज राहून राहून वाटतंय की माझे लवकर जर इथे येणे झालं असत तर माझी सद्गुरूंशी भेट झाली असती. पण तुम्हाला तेही सांगतो की या अशा व्यक्ती असतात त्यांच्या असण्यानसण्याने फार फरक नाही पडत, त्यांचे कारण विचार इतके उच्च दर्जाचे असतात आणि कृती अशी झालेली असते की शतकानुशतकं ती माणसांना प्रेरित करत राहतात.

माझ्या जीवनामध्ये विचारांची एक वेगळ्या प्रकारची लाट आली ती विवेकानंदांमुळे. विवेकानंद, सद्गुरू श्री वामनराव पै हे वैश्विक सत्य सांगतात. विवेकानंद यांच्या पुस्तकाचे वाचन, व्याख्याने आणि सत्संग या तीन गोष्टिंनी माझं आयुष्यं पूर्ण बदलायला सुरुवात झाली. सत्संग म्हणजे अतिशय उत्तमात उत्तम मोठ्या व्यक्तींच्या सोबत राहणं. 'मनुष्य सेवा हीच ईश्वर सेवा.' मानवसेवा आणि चौथा विचार होता त्याग. त्याग आणि सेवा हेच तुमच्या आयुष्याचे सर्वोत्तम सार आहे. यानेच माणसाचं आयुष्य उत्तम होईल.



थोर समाजसुधारक, तत्वज्ञ सद्गुरु श्री. वामनराव पै

उजळती ज्ञानाच्या ज्योती, वेचिता जीवनविद्येचे संस्कारमोती

श्री प्रल्हाद वामनराव पै लिखित आगामी पुस्तक

"जीवनविद्येचे १०८ संस्कारमोती"


श्री. प्रल्हाद वामनराव पै
B.TECH(IIT, POWAI) MAM, TOM(JAPAN)



विवेकानंद म्हणतात, "तुम्ही प्रत्येक जण महान कार्य करण्याकरिता जन्माला आलेला आहात." म्हणून मी त्यावेळेस विचार केला की आजूबाजूचे लोक काय म्हणतात त्यापेक्षा विवेकानंद मोठा माणूस आहे म्हणून मी त्यांच्यावर विश्वास ठेवला. तेच आता वाचलेल्या सद्गुरूंच्या पुस्तकातही आहे. 'तुम्ही आज जे ठरवाल आणि ज्यावर विश्वास ठेवाल, तुम्ही तुमचे पूर्ण जीवन समर्पित कराल तेच तुमच्या जीवनात होईल आणि तेच तुम्ही बनाल' असं ते वाक्य होतं. मला तर पूर्ण खजिनाच सापडला. काय करायच ते सापडलं. कसं करायचं ते पण सापडलं. आणि हे कोणीही करू शकतं!

माझं कॉलेज संपलं आणि मी पोस्ट-ग्रॅज्यूएशनसाठी मी पुण्याला आलो. पुण्याला आल्यानंतर मला असं जाणवलं की माझे वडील खेड्यात डॉक्टर होते त्यांनी जागरुकतेने पैसे देऊन मला पाठविले म्हणून मी पुढे शिकू शकत होतो. माझ्या बरोबरची काही मुलं-मुली असे होते की ते माझ्याइतकेच हुशार होते पण घरची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती, कोणालाही आई वडील नव्हते त्यामुळे त्यांचं शिक्षण तिथेच संपलं. मला फार वाईट वाटलं. मग वाटलं यांच्यासाठी कोणीतरी काहीतरी केलं पाहिजे. हे फार टिपिकल आहे. आपल्याला वाटतं की कोणीतरी काहीतरी केलं पाहिजे. माझं वाचन वाढत गेलं. सत्संग वाढतं गेला. व्याख्यानं ऐकणं वाढत गेल. आणि नंतर जाणवलं की हे जे मला खूप वर्षापासून वाटतंय तेच मी केलं पाहिजे.

मी तेव्हा २४-२५ वर्षाचा होतो. मी शिक्षणक्षेत्रात होतो. ज्ञान प्रबोधिनीत होतो. पुणे विद्यापीठात पीएचडी करत होतो. पुण्यात वयाच्या चोविसिव्या वर्षी जवळपास दीड हजार शिक्षकांचं प्रशिक्षण घेत होतो. सुंदर करिअर सुरू होतं. पण मला वाटायचं कि ज्यांना हे मिळत नाही आहे त्यांच्यापर्यंत मला नाही जाता येत. जे सर्वसाधारण व्यवस्थित राहणारी लोक आहेत त्यांच्यासाठीच मी काहीतरी करतोय. वयाच्या २४-२५व्या वर्षी सद्गुरूंची कृपा झाली आणि पक्का निर्णय झाला सगळं करिअर सोडायचं आणि पूर्ण वेळ अशा मुलांसाठी काम करायचं ज्यांच्यापर्यंत गुणवत्तेचं शिक्षण पोचत नाही. खेड्यात गेलो 'दीपस्तंभ फाऊंडेशन' सुरू केलं. सगळ्यांनी मला वेड्यात काढलं. फक्त डॉक्टरांकडे नेण बाकी होतं. जेव्हा तुम्ही एखाद्या स्वप्नावर विश्वास ठेवता आणि तुम्हाला निश्चित माहीत असतं की हे मी करणार आहे. मला हे करायच आहे. हेच करण्यासाठी माझ्या जन्म झाला आहे. तेव्हा यश-अपयश हा नंतरचा विषय आहे. तुमच्यासमोर सगळे जरी त्याला विरोध करत असतील. "तुझ्याकडून होणार नाही. अरे असं कोणीचं केलेलं नाही. अरे वेडा आहेस का?" असं जेव्हा सगळे म्हणतील तेव्हा लक्षात घ्या. यू आर ऑन राइट ट्रॅक. You are on obsolutely right track! जगामध्ये ८० ते ९० टक्के लोक हे साधारण दर्जाने विचार करणारी आहेत. तुम्ही त्यांच्याप्रमाणे विचार करत गेलात तर तुम्ही तेच व्हाल.




मी काम सुरू केलं तेव्हा माझ्याकडे पैसे नव्हते. चार वर्ष अगोदरच माझे वडील वारले होते. मी वयाच्या बाविसाव्या वर्षापासूनच व्याख्यानं द्यायला जायचो. त्यात जे मानधन मिळायचं त्याच्यातून

खेडयापाडयातल्या मुलांना शिकवायला सुरुवात केली. स्पर्धा परीक्षासाठी मार्गदर्शन, व्यक्तिमत्व विकास, करिअर काउन्सिलिंग हे २००४-०५ मध्ये ग्रामीण आणि आदिवासी विभागातील मुलांसाठी सुरू केलं होतं. मित्र आले मदतीला. काम वाढत गेलं.

माझे लग्न ठरलं तेव्हा माझ्या घरच्यांना आणि सासरच्यांना मी कनव्हिन्स केलं की आपण रजिस्टर लग्न करुयात. त्या वाचलेल्या पैशातून दहा मुल-मुलींना दत्तक घेतलं. त्याचं राहणं, खाणं, शिक्षण, प्रशिक्षण सगळ दीड वर्ष स्वतःच्या मुलांसारख, भाव-बहीणींसारखं केलं. ते दहाच्या दहा क्लास-१, क्लास-२ ऑफिसर झाले. तेव्हा मला आठवण झाली ती कर्मवीर भाऊराव पाटलांची. त्यांनीही असचं केलं होतं. आता हेच करायचं ठरवलं. दुरून दुरून मुलं यायला लागली, विदर्भातून, मराठवाड्यातून यायला लागली. एक कायम लक्षात ठेवा पैश्यांशिवाय काहीही अडत नाही जर तुम्ही ठरवलं पक्क तर! शेकडो मुलं यायला लागली.

नंतर आदिवासी, ग्रामीण मुलांबरोबरच दिव्यांग मुलांसाठी काम करायचं ठरवलं. खूपच चॅलेंजिंग आणि वेगळे काम आहे. निधी नव्हता. तो जमवायला लागला. जागा नव्हती. भाड्याने घरं घेतली. आणि काम सुरू झालं. विशेषतः दिव्यांग मुलींना वयाच्या १८ वर्षानंतर कुणीच निवासी प्रशिक्षण लवकर देत नाही. वेगवेगळ्या क्षेत्रात संधी देत नाहीत. पण मी ते काम सुरू केलं.

२०१६ साली एक मुलगा मला भेटला आणि म्हटला मला पुढे शिकायच आहे पण मी अनाथ आहे. शासन आम्हाला १८ वर्षे वयापर्यंत सांभाळतं आणि नंतर आम्हाला काहीतरी काम शोधावे लागते. कारण आम्हाला आई नाही, वडिल नाही, भाऊ नाही, बहीण नाही जगात कोणीच नाही. माझ्या पायाखालची जमीन हादरली होती त्या दिवशी. या मुलांसाठी काम करणे ही माझ्या आयुष्यात मला सद्गुरूंनी, या निसर्गाने दिलेली एक प्रकारची भेट होती. माझा जन्म कशासाठी झालाय हे समजावण्यासाठी.

'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' या एका वाक्याने या मुलांचं जीवन परिवर्तन करण्याचा आम्ही सगळेजण प्रयत्न करतो आहे. जीवविद्या ज्ञानपीठात येऊन मला आज मंदिरात आल्यासारखं वाटतयं, भाग्यवान झाल्यासारखं वाटतयं.





लोकमान्य सेवा संघ, पारले यांच्या तर्फे झालेल्या ज्ञानेश्वर माउली समाधी सोहळ्या आदरणीय श्री प्रल्हाद दादांनी "ज्ञानेशांचा संदेश" या विषयावर सर्व सामान्यांना कळेल अशा शब्दात अलौकिक असे मार्गदर्शन केले

**रेखा चिटणीस**
कार्यवाह,स्त्री शाखा लोकमान्य सेवा संघ



# घन कचरा निर्मूलन

2018 पासून महाराष्ट्र एकूण पाच कार्यशाळा कंपोस्ट खत गांडूळ खत तयार करण्यास उद्युक्त करणे ओला सुका कचरा विलगीकरण ओला कचरा वेगळा करून त्यातून सेंद्रिय खत निर्मिती करण्याचे मार्गदर्शन केले जाते ई-कचरा विलगीकरण प्लास्टिक विलगीकरण प्लास्टिकला पर्याय सुचविणे व पर्यावरण हानीसंबंधी जागरूकता निर्माण करणे पर्यावरण पूरक वस्तू वापरण्याबद्दल मार्गदर्शन व प्रदर्शने भरविणे 2021 सांगली महाराष्ट्र एकूण सहा कार्यशाळा

# पर्यावरण हाच नारायण

निसर्गनिर्मित विविधता हे परमेश्वराचे ऐश्वर्य आहे. असे जीवनविद्या सांगते. जैवविविधता ही पृथ्वीवरील अद्‌भुत गोष्ट आहे. हजारो प्रकारचे जीव या भूमीवर जन्माला येतात. त्या त्या उपाधीला लागू असणाऱ्या निसर्ग नियमांना अनुसरून जीवन जगतात, त्यांचा मृत्यू होतो, पुनर्निर्मिती होते. हे चक्र सातत्याने सुरू रहाते. त्या त्या उपाधीला जगण्यासाठी आवश्यक असलेली सर्व व्यवस्था निसर्गाच्या योजनेनुसार आधीच उपलब्ध असते. नैसर्गिक पद्धतशीर दिव्य व्यवस्था! साध्या डोळ्यांना न दिसणारे सूक्ष्म जीवजंतू, अगदी लहान अळी-किटकांपासून ते जंगलात किंवा समुद्राच्या तळाशी रहाणाऱ्या अजस्त्र प्राण्यांपर्यंत सर्वांच्या जगण्याची नैसर्गीकरित्या उपलब्ध व्यवस्था असते. त्यांची निर्मिती, स्थिती, लय आणि पुर्ननिर्मिती निसर्ग नियमानुसार होत रहाते.

निसर्ग म्हणजे नेमके काय? एकूणच जैविक-अजैविक घटक मिळून तयार होणारी परिसंस्था. यात प्राणी, मानव, झाडे, नदी, पर्वत या सर्वांचाच समावेश होतो. यातील प्रत्येक घटक हा एकमेकांवर अवलंबून असतो. माणूस हा सुद्धा निसर्गाचाच एक अविभाज्य घटक आहे. वाढत्या शहरीकरणामुळे जंगलात रहाणाऱ्या विमुक्त जाती आणि आदिवासी बांधवांना सुद्धा शहरासारखे सरकारी नियम लागू करण्यात आले. रानावनात हिंडून आपल्या उपजीविकेची व्यवस्था करण्याचे कसब असलेले हे आपलेच लोक नियमांच्या बंधनांमुळे अडचणीत सापडले. ज्यांना कसे तरी औपचारिक शिक्षण घेता आले त्याची परिस्थिती ठीक आहे पण जे शिक्षण घेऊ शकत नाहीत त्यांची अवस्था इकडे आड आणि तिकडे विहीर अशी झालेली दिसून येते.

देशात वाघांची संख्या लक्षात घेऊन त्यावर उपाययोजना करण्यासाठी २००५ साली भारताच्या तत्कालीन पंतप्रधानांनी एक समिती नेमली होती. या समितीने नेहमीच्या वन्यजीव व्यवस्थापनाच्या चौकटीबाहेर जाऊन जंगलात रहाणाऱ्या माणसांच्या सामजिक प्रश्नांचाही विचार केला. यातून एक निष्कर्ष निघाला तो असा की, आजच्या पर्यावरण व्यवस्थापन पद्धतीचा परिणाम म्हणून आरक्षित वनविभाग असलेल्या ज्या जिल्ह्यात वाघांची आणि इतर प्राण्यांची संख्या जास्त, त्या जिल्ह्यात दारिद्र्य रेषेखाली राहणाऱ्या लोकांचे प्रमाणही जास्त आहे. अशा ठिकाणी उपजीविकेची साधनं उपलब्ध नसल्याने गुन्हेगारीचे प्रमाण वाढते.

ही नियमांची चौकट बदलायला हवी आहे. निसर्गाचे रक्षण, जतन तर करायला हवेच, पण ते जंगतातील लोकांना वैरी मानून करणे शक्य नाही आणि योग्य नाही. पाणपक्ष्यांबद्धल जग

अवयवदान अभियान
महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य व विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समिती
(ZONAL TRANSPLANT CO-ORDINATION CENTRE, MUMBAI)
चला, अवयवदानाचा संकल्प करूया, ऋण समाजाचे फेडूया
आतापर्यंत १२००० + लोकांनी अवयवदानाची नोंदणी केली आहे


Donate Organs, Live Forever
Zonal Transplant Coordination Centre Mumbai
donateorgan@jeevanvidya.org
संपर्कः प्रमोद रासम
९३२३५५२८९८

प्रसिध्द भरतपूर तळ्याचे उदाहरण पाहिले तर अनेक शतके ह्या परिसरात स्थानिक लोकांच्या गाईम्हशी चरत होत्या आणि तळ्यात विविध प्रकारचे पक्षी पोहत होते. तिथे प्रचंड प्रमाणावर पक्षाची संख्या वाढली होती. पण या म्हशी पक्ष्यांना उपद्रवकारक आहेत असा निष्कर्ष काही शास्त्रज्ञांनी काढला. त्यांच्या ह्या समजाच्या आधारावर १९८२ साली येथे गायीम्हशींना संपूर्ण बंदी घालण्यात आली. बंदी घालताना लोकांसाठी काहीही पर्याय देण्यात आले नाहीत. लोकांचा विरोध दडपून हे बंधन कार्यान्वित केल्यानंतर असे दिसून आले की, म्हशींच्या चरण्यामुळे तिथे एक विशिष्ट प्रकारचे गवत काबूत राहात होते. चरणे थांबल्यावर ते गवत प्रमाणाबाहेर वाढून तळे बुजायला लागले. ते उथळ झाले, आणि बदकांसारख्या पक्षांच्या दृष्टीने निकामी व्हायला लागले. म्हणजे ज्या पाणपक्ष्यांचा फायदा व्हावा म्हणून ही बंदी आणली होती, त्यांचाच मोठा तोटा झाला.

हे का झाले? चांगल्या चांगल्या शास्त्रज्ञांनीही स्थानिक लोक हे निसर्गाचे वैरी आहेत हे चुकीचे समीकरण गृहीत धरले होते. काही माणसं वेगवेगळ्या प्रकारे निसर्गाची हानी करतात हे खरं आहेच. समाजातल्या सर्वच घटकांनी निसर्गसंपत्तीचा वापर शिस्तीत, काळजीपूर्वक करण्याची गरज आहे. परंतु केवळ स्थानिक लोकांवर निर्बंध लादून हे साधणार नाही. कारण समाजाच्या इतर घटकांपेक्षाही जास्त प्रमाणात स्थानिक लोकांचे हितसंबंध निसर्गसंगोपनाशी घट्ट जोडलेले आहेत. मागच्या लेखात आपण पाहिले की 'जो चोच देतो तो चारा सुद्धा देतो' या उक्तीला अनुसरून हे आदिवासी बांधव निसर्गावर संपूर्णपणे विसंबून असतात. त्यांच्या गरजा कमी असतात. आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा अनिर्बंध वापर न करता त्याचे जतन करण्यासाठी सुद्धा ही लोकं काम करतात. परंपरागत पद्धतीने जीवन जगत ते निसर्गाशी एकरुप झालेले असतात.

शहरी, ग्रामीण आणि आदिवासी भागातील सर्वांच्या हिताचा विचार करून योग्य नियमांची चौकट निर्माण करायला हवी. असे झाले तर आपले पारंपारिक ज्ञान वापरून हे आदिवासी लोक निसर्ग रक्षणात भक्कम योगदान करु शकतील. याबरोबरच या अरण्यावासियांची आर्थिक स्थिती देशातील इतर सर्व घटकांपेक्षा वाईट आहे हेही लक्षात ठेवायला हवे. तेव्हा शहरातील, गावातील प्रत्येक माणसाने निसर्ग संपत्तीचा टिकाऊ पद्धतीने वापर करायला हवा. स्थलकालानुरूप नियोजन करुन जंगलातील संसाधनांच्या नियोजनाबद्दल अलीकडे अभ्यास होऊ लागला आहे ही अत्यंत आनंदाची आणि आशादायक गोष्ट आहे.

**अनिता सुनील मोरे,** सी. बी. डी. बेलापूर
९९६७ ९६ ६१ ५०

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर
स्वच्छता अभियान
स्वच्छतेची जोपासना हीच ईश्वराची उपासना
ओला-सुका ई-कचरा वर्गीकरण व विल्हेवाट प्रशिक्षण
घरगुती व उद्योग क्षेत्रातील शुन्य कचरा उद्दिष्ट्य
सेंद्रीय खत निर्मितीचे प्रशिक्षण व जनजागृती
संपर्क : सुदर्शन कामुनी : ९८६९०४७९९१


## अग्निशमन दलात जीवनविद्या...

नामधारक श्री. कैलास काटे, यांचे स्वतःचे ट्रेनिंग सुरु असताना आपल्या सहकाऱ्यांना जीवनविद्या मिळावी या तळमळीतून त्यांनी अधिकाऱ्यांकडून प्रशिक्षणातील एक तास मिळवला. त्यांच्या प्रयत्नातून अग्निशमन दलातील ६० प्रशिक्षणार्थींना जीवनविविद्येच्या ज्ञानाचे मार्गदर्शन मिळाले. जीवनविद्या मिशनचे शासनासाठी असलेले व्याख्याते श्री. दशरथ शिरसाठ यांनी अतिशय उत्कृष्ठ व सुंदररित्या जीवनविद्या मांडली. त्यांच्यासोबत upcoming faculty श्री. प्रसन्न कुलकर्णी व सौ. शामली दिवटे होते. त्यांनी कार्यक्रमाची आरंभ व समारोप केला.



"तुमचा ऊत्कर्ष तुमच्या हातात" हा ग्रंथ श्री. कैलास काटे यांनी स्वतः सर्व सहकाऱ्यांना भेट दिला. यावेळी त्यांना 'महाराज' म्हणून गंमतीने बोलणाऱ्या सहकाऱ्याने मान्य केले की, "मी तुला चिडवत होतो, पण तु जे करतोय ते best आहे, हे आज मला समजले." लेक्चर संपताच सर्व प्रशिक्षणार्थींनी उभं राहून प्रार्थना म्हणत सर्व faculty, आयोजक नामधारकांची कृतज्ञता व्यक्त केली.





नवी मुंबई महानगरपालिका

स्वच्छ सर्वेक्षण 2023

प्रशस्तिपत्र

जीवनविद्या मिशन

'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत 'स्वच्छ सर्वेक्षण २०२२' मध्ये नवी मुंबई महानगरपालिकेस 'देशातील तृतीय व महाराष्ट्रातील प्रथम क्रमांकाच्या स्वच्छ शहराचा बहुमान' तसेच 'कचरामुक्त शहरांचे फाईव्हस्टार रेटींग' आणि ODF कॅटेगरीत 'वॉटरप्लस' हे सर्वोच्च मानांकन प्राप्त झालेले आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या या राष्ट्रीय स्तरावरील यशात आपल्या सक्रीय सहभागाचे व स्वच्छताविषयक कामाचे मौलिक योगदान आहे. आपल्या या उत्तम कामगिरीची नोंद घेत आपणास हे प्रशस्तिपत्र शुभेच्छांसह प्रदान करण्यात येत आहे.

श्री. राजेश ना. नार्वेकर भा.प्र.से. — आयुक्त तथा प्रशासक, नवी मुंबई महानगरपालिका

श्रीम. सुजाता ढोले — अतिरिक्त आयुक्त (१)

डॉ. बाबासाहेब राजळे

सर्वांना कळविण्यास अत्यंत आनंद होत आहे की सद्गुरू कृपेने काल आपल्या जीवनविद्या मिशनला स्वच्छ सर्वेक्षण २०२३ मधील सहभागासाठी प्रशस्तीपत्रक मिळाले. जीवनविद्या मिशनच्या स्वच्छ पर्यावरण अभियान समितीचे क्रियाशील प्रतिनिधित्व करणारे, संघटन कौशल्याने इतर सहकाऱ्यांच्या मदतीने सातत्याने पर्यावरण रक्षणासाठी झटणारे सद्गुरूंचे सत् साधक श्री. शैलेशजी दिवटे , श्री. मनोजजी पाटील, श्री. उमेशजी धामापूरकर, श्री. शशिकांतजी चव्हाण आणि नवी मुंबईतील इतर क्रियाशील नामधारक बंधु आणि भगिनींच्या सहभागामुळेच जीवनविद्या मिशनला हा बहुमान मिळाला आहे..

विशेष म्हणजे हा सत्कार नवी मुंबईच्या प्रतिष्ठित अधिकाऱ्यांकडून नेरूळ शाखा सचिव यांच्या घरी जाऊन प्रदान करण्यात आला. तुम्हा सर्वांच्या वतीने हा पुरस्कार आपल्या नामधारिका व सचिवांच्या मातोश्री म्हणजेच श्रीमती दमयंती वसंत पाटील यांनी स्वीकारला.

या गौरवासाठी आम्ही नवी मुंबई महानगरपालिकेचे खुप खुप आभार मानतो. तसेच या कार्यात वेळोवेळी, अत्यंत कमी अवधीत सामील होणारे आपल्या नवी मुंबईचे सर्व नामधारक व नागरीक यांची पण आम्ही मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो. हा पुरस्कार तुम्हा सर्वांना अर्पण करून पुढील सर्व अभियानात तुम्ही अशीच साथ द्याल अशी आशा करतो.

**नवी मुंबई १, नवी मुंबई २ व नेरूळ शाखा**

## कारागृहात पोहोचली जीवनविद्या...

आम्ही सांगली कारागृहात समुदेशनासाठी जीवनविद्या मिशनचे कार्य करण्यासाठी गेलो होतो. माझे "जीवन जगणे एक कला" या विषयावर ३०० बंदीवान होते. मी त्यांना सांगितले की मला कल्पना आहे की तुमच्यापेक्षा अधिक गंभीर गुन्हे केलेले आणि करत असणारे कायद्याच्या कचाट्यातून सुटले आहेत आणि बाहेर समाजात वावरत आहेत. याचा तुम्हाला राग येतो आहे. पण वस्तूस्थिती अशी आहे की तुम्हाला कारागृहात होणारा त्रास हा सुसह्य आहे कारण ती मानवाने दिलेली शिक्षा आहे. पण निसर्गनियमा प्रमाणे त्यांनाही शिक्षा भोगावी लागते ती खूपच जास्त आणि वेदनादायी असते. उदाहरणार्थ चुकीच्या मार्गाने मिळालेला पैसा एकटा येत नाहीत तर येताना संकटे रोगराई अपघात घरात अशांतता कलह घेऊनच येतो. या व्याख्यानानंतर बंदीवान जनाना प्रतिक्रिया देण्याचे आवाहन केले.

एक धिप्पाड बंदीवान उठला पुढे आला आणि चक्क त्याने माझ्या पायावर डोके ठेवले आणि म्हणाला आपण सांगितले ते अगदी खरे आहे त्याला गहिवरून आले. तो म्हणाला, मी एकाला चाकूने भोसकून मारले तेंव्हा दोन इंच जखम झाली पण निसर्गनियमानुसार प्रतिक्रिया म्हणून माझी छाती दहा इंच फाडून हृदयाचे ऑपरेशन करावे लागले असे म्हणून त्याने शर्ट काढून सर्वांना तो व्रण दाखविला. आता मी सर्व जन्मठेप शिक्षा भोगली आहे आता मला कुठलाही त्रास नाही व कुठलीही गोळी घ्यावी लागत नाही. जे मी वाईट कृत्य केले त्याची पुरपुर प्रतिक्रिया म्हणजेच हृदयरोगाची शिक्षा भोगावी लागली.

हा एक सर्व बंदीवान यांचे साठी संदेश होता.करावे तसे भरावे लागते. जो चुकीच्या मार्गाने पैसा मिळवितो आणि त्याचा उपभोग घेतो त्याला पुढे दु:ख भोगावेच लागते. क्रिया तशी प्रतिक्रिया हा निसर्ग नियम सिद्ध झाला.

**डॉक्टर दिलीप पटवर्धन**, सांगली



आज दिनांक २१ /११ /२०२२ रोजी तळेगांव येथील नुतन अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये दुपारच्या सत्रात प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी सद्‌गुरू श्री वामनराव पै माऊलींच्या जीवनविद्येच्या तत्त्वज्ञानावर आधारित Key To Success या विषयावर माननीय डॉक्टर दिलीप पटवर्धन यांचे दीड तासाचे सुंदर व्याख्यान संपन्न झाले. उपस्थित 350 विद्यार्थी, व्याख्याते यांनी भरभरून दाद दिली.



श्री सद्‌गुरू वामनराव पै. यांच्या जीवनविद्येवर आधारित जीवन मूल्ये या विषयावर दिनांक १६/११/२०२२ रोजी सांगली येथील सुप्रसिध्द पद्मभूषण वसंतदादा पाटील इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये इंजीनियरिंगला नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी (Induction programme अंतर्गत) माननीय डॉक्टर दिलीप पटवर्धन सर यांचे खूप सुंदर व्याख्यान संपन्न झाले. उपस्थित सर्व विद्यार्थी व प्राध्यापकानी भरभरून दाद दिली.



## बीडमध्ये प्रोजेक्टरच्या माध्यमातून जीवनविद्येचे संस्कार शिक्षण

हे जग सुखी व्हावे व हिंदुस्थान हे राष्ट्र सर्वांगाने सर्वार्थाने पुढे पुढे जावे असा दिव्य संकल्प करून त्यासाठी अखंड आयुष्य प्रयत्नरत राहिले असे विश्वसंत नामयोगी सद्गुरू श्री वामनराव पै प्रणीत जीवनविद्या मिशन मुंबई आणि जीवनविद्या मिशन बीड शाखेच्या संयुक्त विद्यमाने बीड मध्ये विविध उपक्रम सुरु करण्यात आहेत. आजीव विश्वस्त श्री प्रल्हाद दादांच्या संकल्पनेतून साकार झालेले संस्कार शिक्षण अभियान अनेक शैक्षणिक संस्थांमधून राबवले जात असते.

आज बीड येथील पसायदान प्रकल्पाच्या बालगृहातील मुलांसाठी प्रोजेक्टर भेट स्वरुपात देण्यात आला. पसायदान प्रकल्पात गेली अनेक वर्षे अनाथ मुलांचे भरण पौषण व संगोपन केले जात आहे. श्री गोवर्धन दराडे व रंजना दराडे आणि त्यांच्या संपूर्ण कुटुंबियांनी अतिशय तळमळीने हे व्रत अखंड चालू ठेवले आहे.

"या अत्याधुनिक प्रोजेक्टरच्या माध्यमातून या सर्व मुलांच्या प्रशिक्षणाची गुणवत्ता वाढण्यास मोठा हातभार लागेल" असा विश्वास जीवनविद्येचे विश्वस्त भूषण गोसावी यांनी याप्रसंगी आपल्या मार्गदर्शनात व्यक्त केला. संस्कार शिक्षण अभियानाच्या मार्गदर्शिका सौ सुनिता गायकवाड यांनी अगदी सुरूवाती पासून अनेक अडचणीवर मात करत बालगृहाच्या मुलांच्या कल्याणासाठी झिजणाऱ्या संपुर्ण दराडे कुटुंबियांच्या अतुलनीय कार्याचा आपल्या भाषणात गौरव केला.

विश्वस्त व ज्येष्ठ प्रबोधनकार श्री संतोषदादा तोत्रे यांनी मुलांशी त्यांच्या भाषेत संवाद करत छोट्या छोट्या उदाहरणांतून मुल्यशिक्षणाची महत्त्वाची तत्वे मुलांच्या मनी ठसवली. 'जसा तुमचा विचार तसा तुमच्या जीवनाला आकार' असे सांगत मोठा विचार कसा करायचा या बद्दल हसत खेळत मार्गदर्शन केले या प्रसंगी जीवनविद्येच्या बीड केंद्राचे पदाधिकारी श्री अविनाश सावसे, दिगंबर शिंदे, गणेश कुलकर्णी आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा प्रोजेक्टर प्रदान सोहळा पार पडला.

बीड येथील शासकीय बाल सुधारगृहात २०१६ पासून जीवनविद्येमार्फत प्रत्यक्ष बालसंस्कार वर्ग सुरु करण्यात आले, त्यानंतर बीड येथील विविध ठिकाणी सुरु असलेल्या बालगृहातील लहान मुलांसाठी २०२० पासून आ◌ॅनलाईन स्वरुपात संस्कार वर्ग सुरु करण्यात आले, यामध्ये

१) पसायदान बालगृह.
२) सेवाश्रम बालगृह.
३) स्नेहसावली बालगृह.
४) शासकीय बालगृह.
५) इंफांट इंडिया बालगृह.
६) शांतीवन बालगृह
७) सहारा बालगृह

अशा एकूण सात बालगृहामध्ये ऑनलाईन स्वरुपात संस्कारवर्ग सुरु आहेत. जवळ जवळ एक हजाराहून जास्त मुलांपर्यंत जीवनविद्या मिशनचे जीवनोपयोगी ज्ञान अगदी सुरळीत आणि नियमित स्वरुपात पोहचविले जात आहे. बालगृह संचालकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मुलाच्या दैनंदिन कृती मध्ये, वागणुकीमध्ये कमालीचा



# विद्यार्थी मार्गदर्शन अभियान

या संवादामधुन आपणास काय मिळेल.

▶ अभ्यासाच्या पद्धती व अभ्यासाचे महत्त्व ▶ राष्ट्रभक्ती व राष्ट्रप्रेम
▶ शरीराचे महत्त्व ▶ चांगली संगती व व्यसनापासून अलिप्ती
▶ निसर्गनियमांचे जीवनातील महत्त्व

आपल्या शाळेचा फक्त एक तास आम्हाला द्या. संपर्क : श्री. दिलीप निर्मल ९८७०३१०१३७

बदल जाणवू लागला आहे, मुलं आवडीने अभ्यास करत आहेत, टीव्ही पाहण्याचे प्रमाण खूप कमी झाले आहे. नवनवीन उपक्रमामध्ये मुलं भाग घेत आहेत. मुलं अभ्यासाला बसण्यापूर्वी, जेवण करण्यापूर्वी नियमित विश्वप्रार्थना घेऊ लागली आहेत, मुलं छोट्या छोट्या कृती साठी कृतज्ञता व्यक्त करू लागली आहेत, मुलांचे आपापसातील सबंध सुधारत आहेत, तडजोड वृत्ती वाढत आहेत, मुलांचा निसर्गाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला आहे. मुलं फुलांची, निसर्गातील घटकांची कृतज्ञता व्यक्त करायला लागली आहे, येणाऱ्या पाहुण्याचे विश्व प्रार्थनेने आणि God Bless You म्हणून स्वागत करत आहेत, आभार मानत आहेत. हे सर्व बालगृह स्वयंप्रेरित आहेत, बालकल्याणाच्या ध्येयाने प्रेरित या संचालकांनी स्वतः निधी उभारून तसेच समाज घटकांकडून मिळेल ती मदत स्विकारून हे व्रत चालू ठेवले आहे.

या साठी जीवनविद्या मिशन मार्फत त्यांच्या गरजेनुसार वस्तू (विटा-दरवाजे, कपाट, आर्थिक सहाय्य) देऊन सहकार्य करण्यात येत असते. "जीवनविद्येच्या सहकार्यातून आपण या मुलांची सुजाण व आदर्श पिढी घडवू शकू " असा विश्वास संचालक श्री गोवर्धन दराडे यांनी व्यक्त केला.

थोर तत्वज्ञ विचारवंत श्री वामनराव पै यांचे हे जन्मशताब्दी वर्ष असून ते मोठ्या प्रमाणात साजरे केले जात आहे. या जन्मशताब्दीचे ध्येयवाक्य म्हणजे 'प्रत्येक कृती ही राष्ट्रहिताची व विश्वशांतीची'. हा संस्कार आज प्रत्येक व्यक्तीच्या मनात रुजवणे देशाच्या उन्नती आणि उत्कर्षा साठी गरजेचे आहे असे प्रतिपादन श्री अविनाश दराडे यांनी केले. शेवटी स्फुर्तीगीताने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.




# प्लास्टिक मुक्त पर्यावरण अभियान

आज खरचं दिव्यत्वाची प्रचिती आली. टेम्पो यायला थोडा उशीर जरी झाला असला तरी प्रत्येक नामधारक अगदी मनापासून उत्साही होता, कोणाच्याही चेहऱ्यावर जराही थकवा किंवा त्रास जाणवला नाही. आज प्लास्टिक कचरा कलेक्शन पॉइंटवर असलेल्या प्रत्येक नामधारकाला मला स्वतः वैयत्किक भेटता आले. प्रत्येक नामधारकाच्या चेहऱ्यावर जी दिसली ती फक्त आणि फक्त सद्‌गुरू कार्याची तळमळ होती.




प्रत्येकाने अगदी जबाबदारीने आणि तळमळतेने प्लास्टिक जपून ठेवले होते आणि ते खरच अगदी स्वच्छ आणि सुक्या स्वरूपात होते. प्रत्येकजण आवडीने आणि जपून ते आमच्याकडे स्वाधीन करत होते. या सर्व नामधारक आणि कार्यकर्ते यांना माझा सलाम. कार्य कसे करावे हे तुमच्याकडून शिकावे. खूप काही आहे बोलण्यासारखे पण शब्द अपुरे पडतात असेच काहीसे झाले आहे माझे. JVM स्वच्छता समिती, कामुनी साहेब, महेश सावंत साहेब, श्री. रासम साहेब, शाखा पदाधिकारी आणि सर्वांना खूप खूप धन्यवाद..!!

**योगेश लाड**, काळाचौकी



# कोर्सेसचा आनंद....कोर्सेस शेड्युल..

| | | | |
|---|---|---|---|
| Sat - Sun | 03 - 04 December | Corporate | JVD |
| Sun | 04 December | FC | Kothrud |
| Mon - Tue | 05 - 06 December | Level 7 | JVD |
| Sat - Sun | 10- 11 December | Corporate | JVD |
| Sun | 11 December | Yuva (22 to 30) | Kamothe cancelled |
| Sun | 11 December | FC | Chikhali, Malkapur |
| Sun | 11 December | FC | Santacruz (evening) |
| Tue - Wed | 13 -14 December | Level 2 | JVD |
| Sat - Sun | 17 -18 december | Corporate | JVD |
| Sun | 18 December | FC | Vikhroli |
| Tue - Wed | 20 -21 December | Level 3 | JVD |
| Sat - Sun | 24 -25 December | Level 2 | JVD |
| Sun | 25 Dec | FC | Bhayander |
| Sun | 25 Dec | FC | Virar |
| Sun | 25 Dec | FC | Chikhali, Malkapur |
| Tue - Wed | 27 -28 December | Level 3 | JVD |
| Tue - Wed | 3 - 4 January | Level 2 | JVD |
| Sat - Sun | 07 - 08 January | Spiritual Wisdom | JVD |
| Sun | 8 Jan | YC (15 to 21) | Kamothe |
| Sun | 8 Jan | Yuva (22 to 30) | Borivali |
| Tue - Wed | 10 -11 January | Level 6 | JVD |
| Sun | 15 Jan | YC (15 to 21) | Jogeshwari |
| Tue - Wed | 17 -18 January | Level 2 | JVD |
| Sat - Sun | 21 - 22 January | Level 2 | JVD |
| Sun | 22 Jan | Yuva (15 to 21) | Jalgaon |
| Sun | 22 Jan | FC | Amravati |
| Sun | 22 Jan | FC | Thane - Mulund |
| Sat - Sun | 28 - 29 January | Level 3 | JVD |
| Sun | 29 Jan | FC | Jogeshwari |
| Sun | 29 Jan | FC | Aurangabad |





किसी और से नहीं मेरी बेरुखी
बस अपनेआपसे है
खफा मैं तुमसे नहीं या रब
बल्कि अपने ही कर्मो से है

तुझे यह इल्म भी न हो शायद
हम अपने आपसे किस कदर
दिल भटक रहा है दर बदर
अब तो राह दिखा मेरे रहबर

जब होश आया तो यह जाना
बेहोश तो मैं कभी न था
पर इस कदर थी मदहोशी की
तुझे देख भी देखना सका

तू हर लम्हा मेरे पास ही था
मैं ही नादान दूर दूर ढूंढ रहा था
पै की विश्वप्रार्थना ने मिलाया तुझ से
यूं लगा मानो मैं ही मिला मुझ से

**सत्यनारायण,** ९८२०९२१७७४

**जन्म नामधारकाचा..**

जन्म नामधारकाचा सद्गुरू कार्यासाठी,
सद्गुरू कार्यासाठी,जग सुखी करण्यासाठी।।

सद्गुरूंची आम्ही भाग्यवान लेकरं,
पै नाथांनी दिधला सुखाचा सागर,
या सागराचे पाणी वाटण्यासाठी,
जन्म नामधारकाचा सद्गुरू कार्यासाठी।।

पै नाथांनी दिधला जीवनविद्येचा आरसा,
बाप तो अमुचा,त्याचा पुढे चालवू वारसा,
कार्य करू हे देवाचे,त्याचे होण्यासाठी,
नामधारकाचा जन्म सद्गुरू कार्यासाठी।।

**नामधारक-प्रशांत बिर्जे,बेळगाव**

लोकमत हॅलो ठाणे-कल्याण-डोंबिवली

मंगळवार, दि. २९ नोव्हेंबर २०२२

## जीवनविद्या मिशनची संपर्कफेरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**डोंबिवली :** थोर विचारवंत तत्त्वज्ञ सद्गुरू श्री वामनराव पै यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त जीवनविद्या मिशन डोंबिवली शाखेने डोंबिवली पूर्व येथील लोढा हेरिटेज विभागामध्ये विश्वप्रार्थनेच्या जयघोषात रविवारी संपर्कफेरी काढली होती. या संपर्कफेरीची सुरुवात नवनीत जैन मंदिरापासून करून नगरसेवक संदीप माळी यांच्या कार्यालयात, लोढा सर्कल, हनुमान मंदिर, देसले पाडा अशा पाच ठिकाणी झाली.

विश्वप्रार्थना संपर्कफेरीची सुरुवात करण्यापूर्वी विश्वप्रार्थनेचे महत्त्व व महती विशद करण्यात आली. या फेरीमध्ये जीवन विद्या मिशन डोंबिवली शाखा संचलित लोढा उपकेंद्र येथील नामधारक व रहिवासी यांचे विशेष सहकार्य लाभले. विश्वप्रार्थना जपयज्ञामध्ये जीवनविद्या मिशन डोंबिवली शाखेचे सचिव सुमित शिगवन, माजी अध्यक्ष किरण भोरटक्के, युवा कार्यकर्ते उमेश खोचरे, सागर कचरे, कमलाकर मयेकर, रूपेश लाड, स्वानंद बिनसाळे; महिला कार्यकर्त्या सिद्धी खोचरे, किमया शिगवन, यासोबत ३५ हून अधिक नामधारक, नगरसेविका रविना माळी, जिल्हा प्रदेश अध्यक्ष संदीप माळी, प्रसाद माळी, रामनाथ शेट्टी यांच्या उपस्थितीत फेरी पार पडली.

येत्या आगामी वर्षात श्री सद्गुरू जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून जीवनविद्या मिशन डोंबिवली शाखा डोंबिवली शहरात समाजोपयुक्त उपक्रम व अभियान आयोजित करणार आहे

लोकमत हॅलो पिंपरी चिंचवड

रविवार, दि. ४ डिसेंबर २०२२



पिंपळे गुरव येथील शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जीवन विद्या मिशनचे तज्ज्ञ व समुपदेशक.

## विद्यार्थ्यांनी गिरविले अभिनव पद्धतीचे धडे

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** सद्गुरू श्री वामनराव पै यांच्या जन्मशताब्दी वर्षात जीवन विद्या मिशन सांगवी काळेवाडी शाखेमार्फत पिंपळे गुरव येथील काशी विश्वेश्वर विद्यालयात 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' हा विद्यार्थी कोर्स घेण्यात आला. शिक्षण म्हणजे काय ? अभ्यास करण्याच्या अभिनव पद्धती तसेच ज्ञान व शरीराचे महत्त्व, कृतज्ञता, संगत, विचारांचे महत्त्व, स्वयं सूचना, आदी विषयांवर स्वतःचे उत्तम जीवन शिल्प कसे घडवायचे, याचे मार्गदर्शन जीवन विद्या मिशनच्या संचालिका अश्विनी गावडे यांनी केले. लॉकडाऊन, ऑनलाइन शिक्षण, मोबाइलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांच्या बिघडलेल्या मानसिकतेत या ज्ञानामुळे नक्कीच सकारात्मक परिवर्तन होईल, असे मत मुख्याध्यापिका रागिनी देशपांडे यांनी व्यक्त केले.

पाचवी ते दहावीपर्यंतचे विद्यार्थी व शाळेतील शिक्षकांनी या मार्गदर्शनाचा लाभ घेतला. जीवन विद्या मिशन सांगवी-काळेवाडी शाखेतून नूतन लोखंडे व संतोष घाटे यांनी कार्यक्रमांचे संयोजन केले.



सद्गुरू श्री वामनराव पै



श्री. प्रल्हाद वामनराव पै

## ॥ विश्वप्रार्थना ॥

"हे ईश्वरा,
सर्वांना चांगली बुध्दी दे, आरोग्य दे,
सर्वांना सुखात, आनंदात, ऐश्वर्यात ठेव,
सर्वांचं भलं कर, कल्याण कर, रक्षण कर,
आणि तुझे गोड नाम मुखात
अखंड राहू दे"

सद्गुरू श्री. वामनराव पै.

100

१९२३ - २०२३

सद्गुरू श्री वामनराव पै

# प्रत्येक कृती ही
# राष्ट्रहिताची, विश्वशांतीची